कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क




● पुणे ● वर्ष १६ वे ● अंक ३ रा ● ऑक्टोबर-डिसेंबर २०२० ● किंमत रु. २०/- ● पृष्ठसंख्या ४० ● वार्षिक वर्गणी रु. १००/-

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!



माझे कुटुंब, माझी जबाबदारी

www.2factor.in

Promote Your Business

Acquire New Customers

Deepen Customer Relationship

# BULK SMS

*marketing*

**12%** of facebook posts are read

**29%** of tweets are read

**31%** of emails are opened

**98%** of text messages are read

CHECKED

**150**

TIMES A DAY

The average person looks at their phone 150 times a day

## MOBILES ADS

**75%** of people prefer receiving marketing messages via SMS

**15%** prefer receiving email ads

**10%** prefer in-app or push ads

Solv Technologies

2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park
Lower Parel, Mumbai 400013


www.2factor.in
sales@2factor.in
022-48933933

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी चालविलेले नियतकालिक (खासगी वितरणासाठी)

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!



वर्ष १६ वे | ऑक्टोबर-डिसेंबर २०२० | अंक ३ रा


**अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर**
मोबा. ९८१९८८५६६५

**सचिव : श्री. गणेश गुर्जर**
मोबा. ९८९०९९०११३

**कोषाध्यक्ष : श्री. राजेंद्र करंबेळकर**
मोबा. ९८२०२४२५३०


संस्था नोंदणी क्र. : महा-१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र. : एफ ४६५२३ पी. दि. ३/३/२०१६

## संपादक मंडळ


संपादक : श्री. हेमंत पुराणिक, ९९२३८१०१९४
उपसंपादक : श्री. गोपाळ भाटवडेकर, ९८५०९७९७०६
तंत्रज्ञ : श्री. सचिन ताटके, ९८६७१९२३१०
सल्लागार : श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली-सदस्य, ९८३३१६३६५९
सदस्य : सौ. मेघा नाटेकर, ९६३७१५५९४८
श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, ९४०३७०२७३४
श्री. अविनाश मणेरीकर, ९४२२३७९८७८
प्रकाशक : श्री. गणेश गुर्जर, ८१४९९०७७८९


## जाहिरातीचे दर

| पान | एक वेळ | चार वेळा |
|---|---|---|
| पाव | रु. ५००/- | रु. २,०००/- |
| अर्धा | रु. १,०००/- | रु. ४,०००/- |
| पूर्ण | रु. २,०००/- | रु. ८,०००/- |
| शुभेच्छा | रु. ५००/- | रु. २,०००/- |
| पूर्ण पान रंगीत | रु. ३,०००/- | रु. १२,०००/- |
| पृष्ठदान | रु. २००/- | — |


- नियतकालिकाचे नांव : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे **'संपर्क'**
- पत्ता : कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ, द्वारा : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ, 'अनिश प्रासाद' अपार्टमेंटस्, भटांचा बोळ, पुणे ४११ ०३०
- संपादक : श्री. हेमंत पुराणिक
- मुद्रक : श्री जे प्रिंटर्स प्रा. लि. १४१६ सदाशिव पेठ, पुणे ४११०६०



ऑफिस संपर्क : ०२०-२४४३२४४३, मोबा. ८१४९९०७७८९
Email : bkmsindia@gmail.com


## शहर प्रतिनिधी

- श्री. प्रसाद पंडित, मुंबई, ९८६९१५५२१५
- श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
- श्री. प्रदीप हळबे, डोंबिवली, ९८३३१६३६५९
- श्री. मनीष नवाथे, नागपूर, ९८५०३३१४६०
- सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ७७७३९७३६७९
- श्री. भालचंद्र करंबेळकर, सातारा, ९०११०६३०३०
- श्री. दिलीप ढवळे, रत्नागिरी, ९४२२५४९०८५
- श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
- श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
- श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९४२८२३३१८८
- श्री. ऋषिकेश पळसुलेदेसाई, पुणे ९४०३७०२७३४
- श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
- श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७९९६९७
- श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८८०१३८
- श्री. अजित सरवटे, ठाणे, ९९८७२०५६९०
- सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की, आपली वार्षिक वर्गणी आता रु. ३००/-, रु. ५००/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षांसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वत: रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी. (पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे ३० च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे.) शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक 055210110004008 असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयातच पाठवावा. कृपया मनिऑर्डर पाठवू नये.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी प्रकाशक श्री. गणेश गुर्जर यांनी मुद्रक प्रिन्ट व्ह्यू, २९९, कसबा पेठ, फलटण येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रासाद अपार्टमेंट, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे
# संपर्क
संपर्कात राहू या ! संपर्क वाढवू या !!



जे जे उगवे रोप... तयाला जीव लावुनी फुलवूया
जो जो जन्मे जीव... तयाला प्राणपणाने जगवूया...

जेथे जे जे अंकुरते... त्याला जगण्याचा हक्क असे
रुजण्याचा, फुलण्याचा आणिक फळण्याचा अधिकार असे
तुम्हा-आम्हां जे भाग्य लाभले... ते इतरांना देऊया...

दैवावरती नको हवाला... दैव आपुल्या हातांत
ज्याचा धांवा क्षणोंक्षणी तो देव आपुल्या हृदयांत
त्या दैवाला, त्या देवाला आपण संगे घेऊया...

नव्या युगाचा प्रकाश नूतन... ठेवू त्याचेही भान
नव्या जगाचे नवीन डोळे; ज्ञान आणखी विज्ञान
त्या तेजाचे अंश नवे हे... वादळातही तगवूया...

कुणीतरी मायेने जपले म्हणुनी आलों येथवरी
माणूस म्हणुनी जगण्याचा आनंद भोगतो परोपरी
तोच वारसा प्रेमाचा आपणही पुढती नेऊया...

जे जे उगवे रोप... तयाला जीव लावुनी फुलवूया
जो जो जन्मे जीव... तयाला प्राणपणाने जगवूया...

ही दीपावली आपणां
सर्वांस सुखाची, समृद्धिची व
आरोग्यदायी जावो !

## अंतरंग


१) संपादकीय ..... ३

२) नऊ संख्या आणि नवरात्र अध्यात्मिक संबंध आणि महत्त्व ..... ४

३) समाधानाचा सदरा ! ..... ५

४) चिनी सीफुड मार्केटपासून जागतिक उद्रेकापर्यंत : कोव्हिड-१९ ..... ७

१७) हायजिन आणि सोवळे - स्पृश्यास्पृश्यता आणि आयसोलेशन ..... ११

५) इतिहासातील कऱ्हाडे ..... १४

६) लता मंगशेकरांचा स्वरसुगंध व त्यांच्या नावाचा 'परफ्युम' ..... १६

७) कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली ..... १९

८) वेक अप कॉल ..... २१

९) आयुष्य (कविता) ..... २५

१०) कऱ्हाडपंथी (कविता) ..... २६

१२) ऋणानुबंध.. एका तपाचा ..... २७

१३) आदरांजली : 'संजय आंबर्डेकर' ..... २९

१४) तपस्वी गायक : चिंतामणी भागवत ..... ३१

१५) कऱ्हाडे ब्राह्मण संघ (नागपूर-दुसरी सभा वृतांत) ..... ३३

१६) पुणे संघ (कोरोना डोनेशन वृत्तांत) ..... ३५


'माझे कुटुंब, माझी जबाबदारी'

# संपादकीय

नमस्कार,

कसे आहात सगळे ? सर्वजण सुखरूप असाल अशी आम्ही आशा करतो. श्रीजगदंबेच्या कृपेने सर्वांना निरामय आयुष्य प्राप्त व्हावे ! कोरोनामुळे सामाजिक अंतर राखताना आपल्या संपर्कातही मोठे अंतर पडत गेले. पण आता हे अंतर भरून काढण्यासाठी आम्ही पुन्हा सज्ज झालो आहोत. जानेवारी ते मार्च २०२० च्या अंकानंतर हा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला खूप आनंद होत आहे.

सर्व सुरळीत सुरु असताना हा कोण कुठला कोरोना आला आणि आपली सुरळीत चालणारी गाडी त्याने थांबवली. सर्व काही ठप्प झाले. त्यामुळे साहजिकच आपल्या अंकाचे कामही थांबले. त्यामुळे मासिक स्वरुपात आपल्याला भेटणे शक्य झाले नाही. पण बदलत्या जीवनशैलीला स्वीकारत आम्ही सुद्धा आता नवीन रुपात आपल्या भेटीला येत आहोत.

या साथीमुळे वारी होऊ शकली नाही. गणपती-नवरात्रही साध्या पद्धतीनेच साजरे झाले आणि होत आहे. पण विठ्ठल असो, गणपती असो अथवा जगदंबा असो. हे सर्वचजण डॉक्टर, नर्स, पोलिस, सफाई कर्मचारी, आवश्यक सेवा देणारे सर्व कर्मचारी यांच्या रुपात आपल्या सभोवताली कायमच होते. त्यांचे आशीर्वादही कायम आपणा सर्वांच्या सोबत होते व आहेत.

या कोरोनाच्या काळात मात्र आपण सर्व अनेक गोष्टी शिकलो. ज्येष्ठ नागरीक टेक्नोसॅव्ही झाले. दुरावलेले लोक जवळ आले. आपल्या गरजा किती मर्यादित असू शकतात तेही कळले. बचतीची गरज कळली. ज्यांना घरात बसण्याची सवय नाही तेही घरी बसले आणि सर्वांनीच कोरोनाला हद्दपार करण्याचा विडा उचलला. अनेकांनी आपापल्या परीने जमेल तशी मदतही केली. समाजभान राखून आपल्या संघांनीही या कोरोना काळात मोठ्या प्रमाणात मदत केली. डॉक्टर, नर्स, पोलिस, सफाई कर्मचारी, आवश्यक सेवा देणारे सर्व कर्मचारी यांना जमेल तशी मदत केली. आपल्या ज्ञातीतील गरजू पुरोहितांना, ज्ञातीतील गरजू लोकांना मदत केली. शिवाय निसर्ग वादळामुळे नुकसान झालेल्या ज्ञातीतील गरजू लोकांनाही वेळेत मदत पोहचवली. हे सर्व आपल्या सर्वांच्या सहकार्यानेच साध्य झाले. त्याबद्दल आपणा सर्वांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. या सर्व मदतीची माहिती या अंकातून आपल्याला वाचायला मिळणार आहे.

सर्वांना दीपावली निरामय आरोग्याची, सुख-समृद्धीची, भरभराटीची जावो अशी त्या जगन्नियंत्याचरणी प्रार्थना करून इथेच थांबतो.

विजयादशमी, २५ ऑक्टोबर २०२० **- हेमंत पुराणिक**

# नऊ संख्या आणि नवरात्र
# अध्यात्मिक संबंध आणि महत्त्व

- **नवरात्रीच्या घटाभोवती पसरलेल्या मातीत पेरली जाणारी 'नऊ' धान्य :** साळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका, मूग, हरभरा, जवस, मटकी
- **दुर्गामातेचे 'नऊ' अवतार :** शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायिनी, कालरात्री, महागौरी, सिद्धिरात्री
- **दुर्गादेवीची 'नऊ' नावे :** अंबा, चामुंडा, अष्टमुखी, भुवनेश्वरी, ललिता, महाकाली, जगदंबा, नारायणी, रेणुका
- **महाराष्ट्रातील देवीमातेची प्रसिद्ध 'नऊ' देवस्थानं:** वज्रेश्वरी (वसई), महालक्ष्मी (डहाणू), महाकाली (अडिवरे), सप्तशृंगी (वणी), रेणुकादेवी (माहूर), महालक्ष्मी (कोल्हापूर), तुळजाभवानी (तुळजापूर), योगिनीमाता (अंबेजोगाई), श्री एकवीरादेवी (कार्ला)
- **नवरात्रींचे 'नऊ' रंग :** लाल, निळा, पिवळा, हिरवा, राखाडी, भगवा किंवा केशरी, पांढरा, गुलाबी, जांभळा
- **नवग्रहांच्या 'नऊ' समीधा :** रुई, पलाश, खदिर, अपामार्ग, पिंपळ, औदुंबर, शमी, दुर्वा, कुश
- **नवग्रहांची 'नऊ' रत्न :** माणिक, मोती, प्रवाळ, पाचू, पुष्कराज, हिरा, नीलमणी, गोमेद, वैडूर्य, पीतवर्ण-मणी
- **'नऊ' प्रकारचे दान :** अन्नदान, धनदान, भूदान, ज्ञानदान, अवयवदान, श्रमदान, रक्तदान, वस्त्रदान, देहदान
- **नवविध भक्तीचे 'नऊ' प्रकार :** श्रवण, कीर्तन, स्मरण, अर्चन, पादसेवन, वंदन, सख्य, दास्य, आत्मनिवेदन
- **प्रसिद्ध 'नऊ' नाग :** शेष, वासुकी, तक्षक, शंखपाल, कालिया, कर्कोटक, पद्मक, अनंत, पद्मनाभ



- **समस्त मानवजातीला सामावून घेणाऱ्या पृथ्वीचे नवखंड :** भरतखंड (पूर्व), केतुमालखंड (पश्चिम), रम्यखंड (दक्षिण), विधिमालखंड (उत्तर), वृत्तखंड (आग्नेय), द्रव्यमालखंड (नैऋत्य), हरिखंड (वायव्य), हर्णखंड (ईशान्य), सुवर्णखंड (मध्य)
- **मानवी देहांतर्गत असलेले 'नऊ' कोश :** अन्नमय, शब्दमय, प्राणमय, आनंदमय, मनोमय, प्रकाशमय, ज्ञानमय, आकाशमय, विज्ञानमय
- **मानवी मनाचे 'नऊ' गुणधर्म :** धैर्य, सामर्थ्य, भ्रांती, कल्पना, वैराग्यवादी, सद्विचार, रागद्वेषादी, असद्विचार, क्षमा, स्मरण, चांचल्य
- **मानवी शरीराच्या 'नऊ' अवस्था :** मातेच्या उदरातली निषेक रुपावस्था, गर्भावस्था, जन्म, बाल्य, कौमार्य, तारुण्य, प्रौढत्व, वृद्धत्व, मृत्यू
- **नाथांच्या नीतीशास्त्रातली 'नऊ' रहस्य :** आयुष्य, वित्त, गृहछिद्र, मैथून, मंत्र, औषध, दान, मान, अपमान

आई जगदंबेची अखंड कृपा आपल्या सगळ्यांवर आणि कुटुंबियांवर राहो... आणि सर्वांचे जीवन आनंदमय आणि सुखमय होवो, अशी 'श्री आई जगदंबेच्या चरणी' प्रार्थना !

*नाकीचा निर्मळ मोती ।*
*मळवट भाळी रेखिती ।।*
*महाळुंग उजव्या हाती ।*
*शिवलिंग मस्तकावरी ।।*
*आई अंबाबाईचा उदे उदे ।।*

। श्री स्वामी समर्थ माऊली । ✻ अंक शास्त्रातील महत्त्वपूर्ण असलेली संख्या, ९+९ किंवा ९ x ९ कसंही केले तरी एक अंकी संख्या नऊच येते. परिपूर्ण संख्या येणाऱ्या नवरात्रीमध्ये ९ या संख्येत प्रभुत्व असणार.

**शुभदा गुर्जर,** पुणे
८३९०२९००४५

# समाधानाचा सदरा !

लॉकडाउनची भयानक शांतता सगळीकडे पसरून राहिलेली ! अशा शांत सकाळी फोनचा दणकून आवाज आला. इतक्या सकाळी आपली आठवण कोणाला बरं झाली ? तर पलीकडून माझ्या सखीचा, सुजाताताईंचा आवाज !

''वहिनी, कशा आहात ? बऱ्या आहात ना ? घराबाहेर पडू नका, काळजी घ्या !''

खरं तर ह्या सुजाताताई आत्ताच परिचित झालेल्या. रोज माझ्या घरी येणाऱ्या. टिपिकल कोकणातली ही हसतमुख गृहलक्ष्मी ! वीतभर कंबर, उंच, शिडशिडीत बांधा, पण काटक ! गुहागरजवळ त्यांचं गाव. गावाला मोठ्या कष्टानं बांधलेलं घर. कामातला वक्तशीरपणा शिकावा तर आमच्या सुजाताताईंकडून ! बरोबर दहा वाजता घराची बेल वाजणार, नि हसतमुखाने घरात प्रवेश. उगीचच वेळ फुटक घालवणे नाही, की कोणाच्या कागाळ्या-लावालाव्या नाही. आपलं काम अगदी प्रेमाने निपटायचं. लादी तर इतक्या लख्ख पुसतात की सांगू, त्यावर पाय द्यायलाही नको वाटावं !

सुजाताताईंना तीन मुली, पण आजवर त्यांच्या तोंडून कधी खंत ऐकली नाही. उलट मुलींचं इतकं कौतुक आहे, अहो माझी धाकटी उत्तम खो-खो खेळते. सांगू राज्यस्तरावर खेळायला जाते. मोठी तर पदवीधर झाली आहे. याचा सार्थ अभिमान बाळगून आहेत. बाईंचे यजमानही कष्टाची कामं करतात. पण दोघांचेही विचार सात्विक आणि सोज्वळ ! आपण कोणाला मदत कशी करू ? याबद्दल सदैव सतर्क ! समाधान हा त्यांच्या आयुष्यातला परवलीचा शब्द असावा.

नाचणीची आंबील असो, नाहीतर तांदळाची उकड आनंदाने तृप्त होणारच ! शिवाय भारी कौतुक. नवीन शिकायचं कुतूहलही तेवढंच. मी घरी करून पाहीन, असा नाविन्याचा ध्यासही.

त्यादिवशी.. दारावरची बेल पावणेदहाला वाजली, दारात सुजाताताई !

'अरे आज लवकर कशा ?' म्हणेपर्यंत कोपऱ्यातली शिडी आणली नि, चढून पंखे पुसायला सुरुवात केली. ''आठवडाभर मला पंख्यावर धूळ दिसतेय. आज जरा लवकरच घरून निघाले !'' मी अवाक् होऊन ... शिडी धरायला गेले, तर ''घाबरू नका, मला सवय आहे. आज दोन नि उद्या दोन पुसीन.''

कामातला वक्तशीरपणा म्हणजे काय ? कधी दहा-पंढधरा मिनिटं उशीर होणार असेल तर, फोन करून सांगणार. नि नीटकेपणा तर त्यांच्याकडून शिकून घ्यावा. टॉवेल वाळत घालताना दोन्ही टोकं एकमेकांना जुळलेलीच मिळणार. ''सुजाताताई एखाद्या रविवार मुलींसोबत वेळ घालवा, सुट्टी घ्या हो !'' तर म्हणतात कशा -

''गणपतीत, माघी गणपतीत नि शिमग्याला गावी जावं लागतं ना ! म्हणून सुट्ट्या साठवून ठेवते.'' मागच्यावेळी गावाहून आल्या तर घराचं सगळं, व्हिडिओ शूटिंग करून आणलं होतं. भारी नेटकं छान घर. दारासमोर असलेलं तुळशीवृंदावन. परसातली झाडं, नारळी, पोफळी, फुलझाडं. मीही भान हरपून सारं बघत होते. इतक्यात मला म्हणाल्या, ''वहिनी एकदा माझ्या घरी गावाला याल रहायला ?''

''हो, चांगली चार दिवस येईन की ! फक्त अट एकच.. शाकाहारी जेवू घालायचं !''

यावर आम्ही दोघी खळखळून हसलो.

त्यादिवशी नेहमीप्रमाणे हसत एंट्री केली, नि आल्या-आल्या मला म्हणाल्या, ''वहिनी तुम्हाला कडकडून भेटायचंय !''

''अगोबाई, काय विशेष ?'' तोंडाचा चंबू करत मी विचारलं, तर म्हणाल्या कशा ?

‘‘अहो, काल त्या कोपऱ्यावरच्या घरी लादी पुसत होते. तर त्यांच्या मोठ्या टीव्हीवर तुम्ही दिसलात. काम टाकून पहिल्यांदाच, तुम्हाला बोलताना पाहिलं आणि किती आनंद झाला सांगू ? त्या ताईंना म्हटला, ‘‘मी यांना ओळखते. यांच्या घरी पण मी काम करते. वहिनी, खूप भारी वाटलं मला ! मनात अभिमान दाटून आला.’’ असं म्हणून चक्क घट्ट मिठी मारली मला. मीही त्यांच्या प्रेमाने अगदी भारावून गेले.

खरं तर एका छोट्याशा खोलीत हे कुटुंब रहातं. घरात पाच माणसं ! तेही खोलीच्या वरच्या भागात ! अरुंद लोखंडी जिना. एवढ्या माणसांचं पाणी चढवून वर न्यायचं. स्वयंपाक करायचा नि, सारं. एवढं करून सकाळी सातला बाहेर पडायचं नि पाचला परत घरी. दिवसभर राबायचं. आणलेला डबा कुठेतरी जिन्याखाली बसून खायचा. पण आनंदाने. इतक्या घरी जाऊन सुद्धा कुणाच्या लावालाव्या नाही, की कुणाबद्दल वाईट बोलणं नाही. कसली तक्रार नाही, की खेद नाही. कधीतरी वाटतं, हा समाधानाचा सदरा कुठे बरं गवसला असेल ह्यांना ? कधी वाटतं, अनंत काणेकरांची कविता कधी बरं वाचली असेल ह्यांनी.

आहे अनंत निळे आकाश<br>
अनंत आहेत तारे, ठाऊक सारे<br>
तरी चौकटीत माझ्या खिडकीच्या<br>
कौंडलेले चौकोनी आकाश, आणि...<br>
त्यातले चार-पाच तारे...<br>
मजला प्यारे, मजला प्यारे !

आत्ता घरी बसायच्या काळातही आमचे दोन दिवसांनी संभाषण होते. मला प्रश्न पडतो, त्या एवढ्याशा खोलीत दिवसभर राहूनही कंटाळा, तक्रारीचा सूर नाही. उलट आमची चौकशी, प्रेमाने !

आजवर परिचयातल्या खूप जणांना सुजाताताईबद्दल बोलले. तसंच त्यादिवशी माझी जुनी मैत्रीण वसुधा हिला ताईबद्दल सांगितलं... आणि मी किती भाग्यवान आहे याचं तोंडभर कौतुक केलं. यावर वसुधा म्हणाली, ‘‘गेली २५-३० वर्ष या भागात रहातेय. तू आत्ता येथे आलीस. खरं तर या मदतनीसांबद्दल मी एवढंच म्हणीन, ‘काम होईल, पण तुमच्या मनासारखी स्वच्छता मात्र मिळणार नाही. तेव्हा तू खरंच भाग्यवान आहेस,’’ पुढे जाऊन मी तिला म्हटलं, आणि एक धक्का देऊ ?

‘‘अगं, माझी आई इतके दिवस होती, आता ती पुण्याला गेली. तर एक तारखेला पैसे दिल्यावर त्यांनी एक नोट मला परत दिली. म्हणाल्या, ‘‘आता आईचे कपडे कमी झाले ना, मग एवढे पैसे नकोत मला !’’

‘‘वसुधा, त्यांच्या मनाचा मोठेपणा, त्यांना किती श्रीमंत करून गेला.’ माझा हात दाबत वसुधा मला म्हणाली, ‘‘शोभा मला सांग कोणतं बरं व्रत केलं होतंस, म्हणून या सुजाताताई तुला मिळाल्या ?’’


तेव्हापासून आपण कोणतं बरं व्रत केलंय ? याचा मी शोध घेतेय ! अजून तरी उत्तर मिळालेलं नाही आहे. मिळालं की अवश्य सांगेन.

**शोभा नाखरे,** मुंबई
९८६७७८७३९८



# चिनी सीफुड मार्केट पासून जागतिक उद्रेकापर्यंत कोव्हिड-१९

कोव्हिड-१९ (Covid-19) हा इंग्रजीमधील 'कोरोना व्हायरस डीसीस' म्हणजेच कोरोना विषाणूने होणारा रोग या शब्दांचा संक्षेप आहे. सद्य परिस्थितीत हा उपद्रवी जंतु 'विषाणू' या शब्दाच्या उत्पत्तीस म्हणजेच 'अणू एवढा लहान पण विषाने भरलेला' या अर्थास अगदी पात्र ठरत आहे. गेल्या दशकात 'श्वसनसंस्थेच्या संसर्गजन्य रोगाचा जागतिक उद्रेक ही फक्त काळाचीच बाब आहे' अशी गंभीर चेतावणी देणारे बरेच वैज्ञानिक लेख प्रकाशित झाले होते. तसेच २०१९ मध्ये अमेरिकेच्या 'हेल्थ अँड ह्युमन सर्व्हिसेस' या शासकीय संस्थेने 'क्रिमसन कॉन्टेजियन' नावाने चीन मधून सुरुवात होऊन जगभरात पसरू शकणाऱ्या साथीच्या श्वसनरोगाची संगणकाद्वारे रंगीत तालीमसुद्धा केली होती. तरीही आज या परिचित शत्रूने जगाला अशा बिकट परिस्थितीत आणून सोडले आहे. या विषाणूबद्दलचे सखोल ज्ञानच आपल्याला या संकटातून सोडवू शकेल.




साधारणपणे १०० नॅनोमीटर म्हणजे एका मुंगीपेक्षा १०,००० पटीने लहान असे हे विषाणू सजीव आणि निर्जिव यामधील सीमा म्हणून ओळखले जातात. सर्व सजीव पेशींमध्ये जनुकीय माहिती वाचून स्वतःची प्रतिकृती तयार करणे आणि त्यासाठी लागणारा कच्चा माल आणि ऊर्जा निर्माण करणे किंवा मिळवणे यासाठी गुंतागुंतीची यंत्रसामग्री असते. याच्या उलट, विषाणूंमध्ये अशी कोणतीच यंत्रसामग्री नसून, फक्त न्यूक्लीक आम्लावर आधारित लिपीमधील जनुकीय माहिती एका संरक्षणकवचात साठवलेली असते. अशा स्थितीत विषाणू स्वतःहून जगू शकत नाहीत आणि त्यामुळे त्यांना दुसऱ्या सजीवाला संसर्ग करून त्याच्या पेशीतील यंत्रसामग्री काबीज करणे आणि ती स्वतःच्या प्रति बनवण्यासाठी वापरणे यावर अवलंबून राहावे लागते. या प्रक्रियेत विषाणू संक्रमित पेशीतील काही घटक सुद्धा चोरतात, जे ते रोगप्रतिकार प्रणालीपासून लपण्यासाठी किंवा नवीन पेशींना ओळखीचे वाटून फसवण्यासाठी वापरू शकतात. त्याचप्रमाणे जेव्हा काबीज केलेल्या पेशींची यंत्रसामग्री विषाणूंच्या प्रति बनवते तेव्हा विषाणूंच्या जनुकीय माहितीत हेतुपुरस्सर किंवा प्रासंगिक बदल होतात. यास जनुकीय उत्परिवर्तन किंवा 'जेनेटिक म्युटेशन' असे म्हणतात. या प्रक्रियेतून विषाणूंची जनुकीय माहिती विकसित होते आणि ते अधिक घातक बनतात. जनुकीय उत्परिवर्तनामुळेच विषाणू विविध प्राण्यांमधून मानवामध्ये संक्रमित होऊ शकतात. याची सामान्यतः ज्ञात उदाहरणे म्हणजे चिंपांझींकडून मानवात आलेला 'एच.आय.व्ही' किंवा पक्ष्यांमधील आणि मानवातील इन्फ्लुएंझा विषाणूंची जनुकीय माहिती जुळवून विकसित झालेला 'एच १ एन १' (बर्ड फ्ल्यू) विषाणू. अशा विषाणूंचा मूळ स्त्रोत आणि प्रसार याबद्दलची माहिती आपणास प्राण्यांपासून होणारा संसर्ग थांबवण्यास आणि प्रभावी लस शोधण्यास मदत करू शकते.

कोव्हिड-१९ हा रोग 'सार्स-कोव्ह-२' (SARS-CoV-2) या कोरोना विषाणूंच्या पोटजातीमुळे होतो. कोरोना हा विशिष्ट विषाणूंचा एक गट असून यातील विषाणू मानवात संसर्गजन्य श्वसनरोगाची लागण करतात. यात सामान्य सर्दी, खोकल्यापासून गंभीर अशा 'सिव्हिअर ॲक्युट रेस्पिरेटोरी सिंड्रोम' म्हणजेच 'सार्स' किंवा

श्वसनसंस्थेचा तीव्र आजार यांचा समावेश होतो. जनुकीय विश्लेषणावरून मानवी सार्स-कोव्ह-२ विषाणू आणि ऱ्हायनोलॉफस वटवाघळांमधील कोरोना विषाणूमध्ये बरेच साम्य आढळले आहे. ही बाब कोरोना विषाणू मानवात कोठून आला असावा हे दर्शविते. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) २६ मार्च २०२० रोजी 'दि ओरिजिन ऑफ सार्स-कोव्ह-२' या शीर्षकाने एक लेख प्रकाशित केला होता. या लेखात सार्स-कोव्ह-२ विषाणूचा मूळ स्त्रोत चीन मधील वुहान शहरातील 'हुआनन होलसेल सीफूड मार्केट' हा असल्याचे लिहिले होते. सुरुवातीच्या कोव्हीड-१९ रुग्णांपैकी बरेच रुग्ण हे स्टॉल मालक, बाजारातील कर्मचारी किंवा नियमित भेट देणाऱ्या व्यक्तींपैकीच होते. याशिवाय डिसेंबर २०१९ मध्ये या बाजारातून घेतलेल्या पर्यावरण नमुन्यांमध्ये सार्स-कोव्ह-२ विषाणू आढळला होता. हुआनन मार्केटमध्ये विविध वन्य प्राण्यांच्या मांसाची विक्री होत असल्याने यापासून सार्स-कोव्ह-२ विषाणूचा संसर्ग मानवास झाल्याची शक्यता आहे. तसेच आधीच लागण झालेल्या व्यक्तीकडून मार्केटमधील गर्दीमुळे इतरांना लागण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. वुहान शहरातून जगभरात सार्स-कोव्ह-२ हा विषाणू कसा पसरला असावा आणि पसरताना या विषाणूची जनुकीय माहिती कशी विकसित झाली असावी याचा अभ्यास इंग्लंड आणि जर्मनीच्या शास्त्रज्ञांनी 'फायलोजेनेटिक नेटवर्क ॲनालिसिस' या तंत्राने केला आहे. या अभ्यासात शास्त्रज्ञांना सार्स-कोव्ह-२ विषाणूचे अनेक उपप्रकार सापडले, ज्यांचे जनुकीय साम्याच्या आधारावर तीन गटांमध्ये विभाजन केले गेले. उपप्रकार 'ए' (A) हा वटवाघळांमध्ये आढळलेला विषाणूशी सर्वात जवळचा असून हा वुहान शहरातही आढळला होता. त्यानंतर 'ए' उपप्रकाराच्या आवृत्त्या अमेरिका आणि ऑस्ट्रेलियातील रुग्णांमध्ये आढळल्या, ज्यापैकी काही व्यक्ती पूर्वी वुहानमध्ये राहत असल्याची पुष्टी झाली. 'ए' (A) उपप्रकारातील विषाणूचे दोन वेळा उत्परिवर्तन होऊन 'बी' (B) या उपप्रकाराची उत्पत्ती झाल्याचे शास्त्रज्ञांच्या निदर्शनास आले. 'बी' हा उपप्रकार वुहान मधील उद्रेकाला मुख्यतः कारणीभूत होता परंतु तो पूर्व आशिया खंडाच्या पलीकडे पसरला नाही. पूर्व आशियातील सिंगापूर, हाँगकाँग आणि दक्षिण कोरियासारख्या काही भागांमध्ये हा उपप्रकार 'सी' (C) या उपप्रकारात उत्क्रांत झाल्याची शक्यता दर्शवली जाते. हाच 'सी' उपप्रकार युरोप खंडात आज सर्वत्र थैमान घालत आहे. भारतातही सार्स-कोव्ह-२ विषाणूचा प्रादुर्भाव झाला आहे, परंतु यास वरील गटातील नक्की कोणता उपप्रकार कारणीभूत आहे याचा अजून अभ्यास झालेला नाही.

सार्स-कोव्ह-२ हा विषाणू कोव्हीड-१९ बाधित रुग्णाच्या खोकला, शिंक तसेच उच्छवासातून बाहेर पडणाऱ्या थेंबांद्वारे पसरतो. निरोगी व्यक्तीला विषाणूची लागण श्वासोच्छवासाद्वारे किंवा जेव्हा ती व्यक्ती दूषित पृष्ठभागाला स्पर्श केल्यानंतर त्याच हाताने डोळा, नाक किंवा तोंडाला स्पर्श करते तेव्हा होऊ शकतो. यामुळेच जागतिक आरोग्य संघटनेने इतरांपासून कमीत कमी १ मीटर किंवा ३ फूट अंतर ठेवणे आणि वारंवार हात स्वच्छ धुणे किंवा सॅनिटायझरचा वापर करणे महत्त्वाचे ठरवले आहे. सिंगापूरमधील एका संशोधनात असे आढळले आहे की, खोकताना किंवा शिंकताना रुमालाचा अथवा मास्कचा वापर न केल्यास हे विषाणू हवेतून १५ फुटांपर्यंत लांब पसरू शकतात. या कारणाने आजारी व्यक्तींनी योग्य अशा मास्कचा वापर केल्यास विषाणूचे संक्रमण थांबवण्यास मदत होऊ शकते. येथे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की कोणताही दूषित पृष्ठभाग विषाणू पसरवू शकतो, त्यामुळे हातमोजे (ग्लोव्हस्) आणि मास्क यांचा पुनर्वापर टाळावा.



एकदा लागण झाल्यावर, काटेरी चेंडूसारखे दिसणारे कोव्हीड-१९ चे हे विषाणू श्वासनलिकेतील पेशींना चिकटतात आणि श्वासोच्छवासाद्वारे अगदी फुफ्फुसांपर्यंतही पोहोचू शकतात. विषाणूंच्या पृष्ठभागावरील काटे म्हणजेच त्यांच्या अँटेना त्यास श्वसन पेशींवरील 'ऐस-२' ( एन्जिओटेन्सिन कन्वर्टेस एन्झाइम २) या प्रथिनास जोडण्यास मदत करतात. ऐस-२ हे प्रथिन श्वसन पेशींचे जणू एकप्रकारचे कुलूपच असते. त्यामुळे या कुलुपाची चोरचावी वापरुन कोव्हीड-१९ चे विषाणू पेशींच्या आत शिरतात. येथे ते पेशींची यंत्रसामग्री काबीज करून स्वतःच्या प्रति बनवण्यास सुरुवात करतात. ही प्रक्रिया पेशींना ऊर्जा आणि इतर मुलभूत गरजांपासून वंचित ठेवते आणि त्यामुळे पेशी मरू शकतात. संक्रमणाच्या सुरुवातीच्या काळात, हा विषाणू मानवी शरीरास नवीन असल्याने त्यामुळे होणारी हानी ओळखण्यास शरीरास वेळ लागतो. या संधीचा फायदा घेऊन हा विषाणू स्वतःच्या असंख्य प्रति बनवून घेतो आणि अधिकाधिक पेशींना हानी पोहोचवू लागतो. या कालावधीला 'उद्भवन कालावधी' किंवा 'इन्क्युबेशन पिरिएड' म्हणतात. या दरम्यान संक्रमित व्यक्ती शक्यतो कोणतीही लक्षणे दाखवत नाहीत पण विषाणू पसरवू शकतात. पेशींना झालेली हानी अखेरीस रोगप्रतिकार प्रणालीला सतर्क करते. परंतु या नवीन शत्रूबद्दल काहीच माहिती नसल्यामुळे, गोंधळलेली प्रतिकारयंत्रणा आपल्या शस्त्रखान्यातील जास्तीत जास्त शस्त्रांचा मोठ्या प्रमाणावर वापर करून आक्रमणाचा सामना करू पाहते. यात बऱ्याच निरोगी पेशींनाही विनाकारण हानी पोहोचते. जर विषाणूने केवळ वरच्या श्वसनमार्गावर (घसा, श्वासनलिका इत्यादींवर) संसर्ग केला असेल तर घसा खवखवणे, नाक चोंदणे किंवा नव्याने सुरु झालेला कोरडा खोकला अशी लक्षणे दिसून येतात. आजाराची तीव्रता वाढल्यास मेंदू शरीराचे तापमान वाढवून ते विषाणूस प्रतिकूल बनवण्याचा प्रयत्न करतो, यालाच ताप येणे असे म्हणतात. जर हा विषाणू फुफ्फुसांपर्यंत पोहोचला, तर तो रक्तात प्राणवायु विरघळवणाऱ्या अतिसूक्ष्म आणि नाजूक अशा पेशींना नुकसान पोहोचवतो. यामुळे धाप लागणे, छातीत दुखणे इत्यादी लक्षणे दिसतात. फुफ्फुसांमध्ये खोलवर होणारी विषाणू आणि रोगप्रतिकार यंत्रणेमधील लढाई तीव्र झाल्यास होणाऱ्या हानीचे रुपांतर निमोनियामध्ये होऊ शकते.

प्रत्येक व्यक्तीच्या जैविक विभिन्नतेमुळे त्यास होणाऱ्या रोगाची तीव्रता वेगवेगळी असू शकते, या आधारावर कोव्हीड-१९ पीडितांचे पुढीलप्रमाणे तीन प्रकार पडतात. ज्या व्यक्तींना सार्स-कोव्ह-२ विषाणूची लागण झाली आहे परंतु काही काळानंतरही त्या कोणतीही लक्षणे दाखवत नाहीत अशा व्यक्ती पहिल्या प्रकारात मोडतात. या व्यक्ती क्वचितच विषाणू पसरवू शकतात. कारण त्यांच्यामध्ये विषाणूंची पातळी खूप कमी असते. दुसऱ्या प्रकारात सततचा खोकला, सर्दी किंवा ताप अशी सौम्य ते मध्यम लक्षणे दाखवणाऱ्या व्यक्तींचा समावेश होतो. जागतिक आरोग्य संस्थेने दिलेल्या माहितीनुसार कोव्हीड-१९ पीडितांमधील ८०% रुग्ण या प्रकारात मोडतात. हे रुग्ण कोणत्याही विशेष उपचारांशिवाय साधारणतः दोन आठवड्यांमध्ये बरे होतात. यातील बहुतांश रुग्ण फारसे आजारी नसल्याने सामाजिक संपर्क टाळत नाहीत आणि त्यामुळे इतरांना संसर्ग करण्यास कारणीभूत ठरतात. तिसऱ्या प्रकारातील कोव्हीड-१९ रुग्णांची टक्केवारी साधारणतः २०% असून हे रुग्ण गंभीर श्वसनविकाराची लक्षणे दाखवतात. यात मुख्यतः वयोवृद्ध आणि उच्च रक्तदाब, हृदयविकार किंवा मधुमेह यांसारख्या व्याधींनी पीडित व रोगप्रतिकारक शक्ती कमी असलेल्या व्यक्तींचा समावेश होतो. जागतिक आरोग्य संघटनेला २ एप्रिल २०२० पर्यंतच्या कोव्हीड-१९ मृतांमध्ये ६० वर्षावरील व्यक्तींचे प्रमाण ९५% आढळले असून १० पैकी ८ मृत हे वरीलपैकी एक किंवा अधिक आजारांनी ग्रस्त असल्याचेही समजते. यामुळे अशा बिकट परिस्थितीत संवेदनशील लोकांचे संरक्षण करण्याची अत्यंत गरज आहे.

सार्स-कोव्ह-२ विषाणूंचा संसर्ग पसरू नये यासाठी संसर्गजन्य प्रदेशांतून प्रवास करून आलेल्या अथवा संसर्ग झाला असल्याचे निदान झालेल्या व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींना विलगीकरणात ठेवले जाते. परंतु या विषाणूचे निदान करण्यासाठी सध्या उपलब्ध असलेल्या चाचण्या वेळ घेणाऱ्या आहेत आणि त्यासाठी महागड्या तंत्रांची गरज पडते. त्यामुळे सर्व संशयित व्यक्तींची चाचणी करून संसर्ग झालेल्या प्रत्येक व्यक्तीला विलगीकरणात टाकणे शक्य होत नाही. यातून मार्ग काढण्यासाठी त्वरीत करता येऊ शकणाऱ्या सोप्या चाचण्यांचे संशोधन जागतिक पातळीवर सुरू आहे. तोपर्यंत हा रोग सामाजिक संपर्कातून अजून पसरू नये म्हणून जगातील अनेक देशांनी जमावबंदी किंवा संचारबंदी लागू केली आहे. भारत सरकारने थोडासाही विलंब न करता स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय प्रवासावर बंधने आणल्यामुळे कदाचित आज भारतात कोव्हीड-१९ पीडितांची संख्या कमी असावी.

संचारबंदी फार काळ टिकून राहिल्यास त्यातून मोठे आर्थिक संकट उभे राहण्याची शक्यता आहे आणि म्हणूनच जगातील सर्व देश यातून लवकर बाहेर पडण्याच्या धोरणांवर चर्चा करत आहेत. यातले एक धोरण म्हणजे सुरक्षित आणि प्रभावी विषाणूविरोधी (अँटीव्हायरल) औषधांचा शोध. ही औषधे, विषाणूंना निरोगी पेशींमध्ये शिरण्यापासून किंवा स्वतःच्या प्रति बनवण्यापासून थांबवतात. सध्या कोव्हीड-१९ या आजारावर निश्चित असे औषध उपलब्ध नाही. तरीही रेमडेसिवीर, फविपिरावीर यांसारख्या अनेक ज्ञात विषाणूविरोधी औषधांचे तसेच मलेरियाविरोधी हायड्रोक्सीक्लोरोक्विन या औषधाचे सकारात्मक परिणाम डॉक्टरांना दिसून आले आहेत. ही ओषधे आता नियंत्रित वैद्यकीय चाचण्यांमधून त्यांच्या सुरक्षितता आणि कार्यक्षमतेसाठी पडताळून बघितली जात आहेत.

औषधांबरोबरच 'व्हॅक्सीन' म्हणजेच लसीच्या शोधावरही जागतिक शास्त्रज्ञांनी भर दिला आहे. लसीच्या निर्मितीसाठी शास्त्रज्ञांना विषाणूंमधील असा घटक शोधावा लागतो जो मानवी शरीराला हानी पोहोचवू शकणार नाही आणि त्यामध्ये उत्परिवर्तनदेखील होणार नाही. शिवाय हा घटक रोगप्रतिकार प्रणालीला ओळखता व लक्षातही ठेवता यायला हवा. एकदा या निकषांची पूर्तता करणारा घटक सापडला की त्यापासून लस बनवता येते. त्यापुढे हा घटक त्या विषाणूचे जणू ओळखपत्रच ठरतो. याचा वापर करून रोगप्रतिकार प्रणाली त्या विषाणूचा झालेला संसर्ग खूप लवकर ओळखू शकते आणि 'अँटीबॉडीस्' किंवा प्रतिजैविक शस्त्रांचा वापर करून त्याचा खात्मा करू शकते. ही शस्त्रे फक्त त्या विषाणूलाच हानिकारक असल्याने, निरोगी पेशींना होणारी अनुषंगिक हानी सुद्धा वाचते. लसीच्या शोधाची प्रक्रिया फार कठीण असल्याने त्यास दोन ते पाच वर्षे लागू शकतात. त्यापुढे लस सुरक्षित आणि परिणामकारक असल्याचे प्रमाणपत्र वैद्यकीय चाचण्यांमधून मिळवावे लागते. या प्रक्रियेला अजून सहा महिने ते वर्ष जाते. सद्यस्थिती जागतिक सहकार्यातून कोव्हीड-१९ वर गुणकारी लस बनवण्याचा प्रयत्न चालू आहे. ८ एप्रिल २०२० पर्यंत ७८ संभाव्य लसी सापडल्या असून या संशोधनाच्या विविध टप्प्यांमध्ये आहेत. त्यातील तीन लसी वैद्यकीय चाचण्यांपर्यंतसुद्धा पोहोचल्या आहेत. ज्या येत्या काही महिन्यात कोव्हीड-१९ या शत्रूवर विजय मिळवून देऊ शकतील.

तोवर सुरक्षित राहण्यासाठी सामाजिक संपर्क टाळणे हा एकमेव उपाय आहे !

**रोहन आंबर्डेकर**

एम.फार्म., पीएच.डी., चार्टर्ड सायंटिस्ट

(रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री, यु.के.

# हायजिन आणि सोवळे स्पृश्यास्पृश्यता आणि आयसोलेशन

कोविड १९ च्या जागतिक उद्रेकामुळे हायजिन आणि आयसोलेशन हे जुनेच विषय आता पुन्हा ऐरणीवर आले आहेत. कधी नव्हे तर जवळजवळ प्रत्येकजण ही दोन बंधने निष्ठेने पाळू लागला आहे. स्वतःच्या जिवाची आणि आरोग्याची भिती हे त्याचे खरे कारण असले तरी या निमित्ताने का होईना याचे महत्त्व आता सर्वांना पटू लागले हे वाईटातून चांगले निष्पन्न होते या उक्तिप्रमाणे समाधानाचीच बाब म्हणावी लागेल.



या जीवघेण्या आजारावर रामबाण उपाय शास्त्रज्ञांना सापडला आहे असे विश्वासाने म्हणता येत नसले तरी लवकरच तो सापडून सर्व जग या संकटापासून मुक्त होईल अशी चिन्हे दिसू लागली आहेत. तूर्तास इंग्रजीतील म्हण. 'प्रिव्हेंशन इज बेटर द्यान क्युअर' आता यथार्थ वाटू लागली आहे. या प्रिव्हेंशनचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे हायजिन किंवा स्वच्छता. आरोग्याचे प्राथमिक नियम, निर्जंतुकिकरण, निरोगी व्यक्तिने आजारी व्यक्तिपासून सुरक्षित अंतर राखणे... इत्यादी.

आम्ही हेच म्हणत होतो, पण आमचे कोण ऐकतो असा सूर लावणाऱ्या मागील पिढीच्या सांगण्यात काही तथ्य असावे हे आता जाणवू लागेल आहे. सर्वांनाच आपल्या परंपरागत संस्कृती, घराघरात पाळल्या जात असलेल्या धार्मिक आचारपद्धती. पळण, या सर्वांचे स्मरण होऊ लागले.

पूर्विची आणि आजची नवीन जीवनशैली, एकत्र आणि विभक्त कुटुंबपद्धती, कुटुंबातील सदस्यांची संख्या, घरातील ज्येष्ठ सदस्यांचा प्रभाव आणि आज जाणवणारा त्यांच्या मार्गदर्शनाचा अभाव, त्यांनी धार्मिक किंवा नैतिक संहितेद्वारा सांगितलेल्या सवयी, या सर्वांवर एक जागतिक विचारमंथन आता कळतनकळत सुरू झाले आहे. हे आवश्यकच म्हणावे लागेल. जुने ते सर्वच सोने होते असेही नाही आणि पूर्वीचे ते सर्वच वेडगळपणा होता असेही नाही.

आपल्याकडेच नव्हे तर सर्वच धर्मात अनेक प्रथा सोवळे या नावाखाली पाळल्या जात. त्यात स्वच्छता, शुद्धता, पावित्र्य हे अध्याहृत होते. निर्जंतुक वस्त्र-मग ते रेशमाचे असले म्हणजे झाले, असेना का किती कळकळ मळकट, मात्र ते सोवळे असे म्हणणे चूकच. अशावेळेस काही तथाकथित विज्ञानवादी पुढे सरसावतात आणि रेशिम का तर म्हणे ते विद्युतवाहक असते. त्यात आपल्या पूर्वजांची वैज्ञानिक दृष्टी असे समर्थन करतात.

चांदिची-तांब्याची भांडी का तर ती विद्युतवाहक असतात. निगेटिव्ह एनर्जी वाहून नेतात असे काही तरी समर्थन केल्या जाते. खरे म्हणजे स्वच्छ साध्या सुती धूतवस्त्राइतके पवित्र सोवळे दुसरे नाही. रोजचे स्नान तर हवेच पण बाहेरून येताच प्राथमिक क्रिया म्हणजे हातपाय धुणे हे आवश्यकच आहे. पुराणातील नलराजाची कता याबाबतीत आदर्श म्हणावी लागेल. नेहमीच पवित्र-शुद्ध राहणारा नलराजा एकदा मात्र घाईगडबडीत लघुशंकेनंतर हातपाय न धुताच स्नानसंध्येला बसला व त्याच्यात कलिचा प्रवेश झाला. ही कथा सूचक आहे. पापाचा किंवा जंतुचा प्रवेश असाच नकळत होत असतो. गुरुचरित्रात तर दोन संपूर्ण अध्यायच शुचिता, पावित्र्य याचे वर्णन करणारे आहेत. स्नान, स्नानाचे महत्त्व, प्रकार, पावित्र्यभंग झाल्यास शुद्धी कशी करावी, याचे पद्धतशीर वर्णन त्यात वाचावयास मिळते. इस्लाममध्येही नमाजअदा करण्यापूर्वी हातपाय

धुणे आवश्यकच म्हटले आहे. चर्चमधील स्वच्छता कौतुक करण्यासारखी असते. जैन लोक सुद्धा तोंडावर रुमालासारखे पांढरे फडके बांधून स्वच्छता आणि निर्जंतुकीकरणाचे प्राथमिक नियम पाळताना आढळतात. हेच सर्व जवळच्या नातेसंबंधातील जन्मानंतर सोयर आणि मृत्युनंतरचे सुतक या मागील तत्व आहे. पुढे मूळ तत्व मागे पडून फक्त कर्मकांड तेवढे शिल्लक राहिले हा समाजव्यवस्थेतील एक मोठाच दोष म्हणता येईल.

शुद्ध पवित्र, ताजे अन्न सेवन करावे, ते सात्विक असावे, हा भर आपल्याकडे नेहमी दिलेला आहे. श्रीमद्‌भगवत गीतेत तर १७ व्या अध्यायात अन्नाचे सात्विक, राजस आणि तामस असे ३ प्रकार आणि त्यांचे परिणामही विशद केले आहेत. (श्लोक क्र. ८, ९ आणि १०) भोजन स्वच्छ जागेत करावे, पानाभोवती पाणी फिरवावे, सूर्यास्ताच्या आधी करावे. दुसऱ्याचे उष्टे न खाणे, एकाच पात्रात सर्वांनी भोजन न करणे ही बंधने आवश्यक म्हटल्या गेली. अनेकजण मैत्रिचा देखावा म्हणून एकमेकांचे उष्टे अन्न खाण्यात धन्यता मानतात. त्यात आपण किती सांसर्गिक रोगांना निमंत्रित करीत आहोत याचे भान सुशिक्षित लोकही विसरतात. काही चांगले अपवाद असले तरी बहुतांश उपहारगृहात आतील किचनमध्ये काय चालते याचे जरा निरिक्षण करावे. खाद्यपदार्थ किती निर्जंतुक वातावरणात तयार होतात, किती निरोगी कारागीर ते काम करतात, त्याच्या खांद्यावरील टॉवेलला हात, नाक, घाम सर्वकाही पुसल्या जाते. खाण्यापिण्याच्या डिशेश किती काळजीने धुतल्या जातात हे एकदा सहजच जाऊन पहावे. आणि तरी आपण मिटक्या मारीत ते दुप्पट-चौपट पैसे मोजून खातो आणि नंतर डॉक्टरांची बिलेही भरतो. वाढदिवसाची पार्टीही हॉटेलातच दिली आणि केक खाण्यापेक्षा तोंडाला फासला की मगच मुलांना आणि त्यांच्या पालकांना बरे वाटते. बाहेरचे खाऊ नये वगैरे उपदेश आता इतिहासजमा झाले आहेत. मुळात यात काही विशेष तथ्य सांगितले असावे हेच मान्य नाही. घरचे पौष्टिक, ताजे आणि स्वच्छ खाद्यपदार्थ मागे पडून आता फास्ट फूड खाण्यातच मुलांना धन्यता आणि आयांना सुविधा वाटू लागली आहे.

निवासस्थानाची रचना, तेथील हवा आणि प्रकाश, आधुनिकतेच्या नावाखाली स्नानगृह आणि शौचालय एकत्र असणे, तेथील स्वच्छता आणि पाण्याऐवजी टिश्युपेपरचा वापर यांचा गांभिर्याने विचार व्हावा. जागेचा अभाव, वाढत्या किंमती हे मुद्दे काही अंशी खरे असले तरी आरोग्याच्या मूल्यापुढे हे नगण्य आहे. 'शरीरमाद्यं खलुधर्म साधनम्' किंवा 'जान है तो जहाँ है ।' हे सर्व आता कागदावरच राहिले आहे.

**सार्वजनिक स्वच्छता आणि स्पृश्यास्पृश्यताः**

पूर्वी पिढ्यान्‌पिढ्या ठराविक कामे ठरावीक लोकच करत. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागशः (निर्मिले वर्ण मी चारी, गुण कर्मे विभागुनी) ही गीतेतील समाजव्यवस्था किंवा १२ बलुतेदार आणि १८ अलुतेदार अशी पद्धत होती. त्यात कोणावर अन्याय नसून एका घराण्यात एकच काम चालू राहिल्याने येणारी निपुणता गृहित होती. साहजिकच त्या विशिष्ट काम करणाऱ्यांची वस्ती शहरात निरनिराळ्या भागात असावयाची. मात्र दुर्दैवाने काही सामाजिक, राजकीय दबावगट निर्माण झाले आणि ठरावीक वर्गावर अन्याय होत गेले, त्यांची हेटाळणी होत गेली हे तितकेच खरे. यातूनच स्पृश्यास्पृश्यतेचा जन्म झाला. कार्यसुलभतेमुळे, समान कामे समान विभागात झाली तर त्यांची एकमेकांना मदत होणे, एका कामाचा दुसऱ्या कामावर परिणाम न होणे, हेच मुलभूत दृष्टीकोन होते. आजही एम.आय.डी.सी. मध्ये मेडिकल झोन, केमिकल किंवा इतेक्ट्रॉनिक झोन, प्लॅस्टिक झोन असे असतातच. मेडिकल रासायनिक किंवा इलेक्ट्रॉनिक झोनमध्ये इतर विभागांपेक्षा स्वच्छतेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे ठराविक क्षेत्रात वाटून देतात. हिच कार्यनिहाय स्पृश्यास्पृश्यता. यात गैर काही नाही आणि ते आहे हे असेही कोणाला काही वाटत नाही.

काहीजण वैयक्तिक स्वच्छ राहतात, पण सार्वजनिक ठिकाणी मात्र कर्तव्यभान विसरतात. पान खाणे ठीक आहे पण खाऊन झाल्यावर रस्त्यावरच पिंक टाकणे, आपल्या घरातील कचरा बाहेर रस्त्यावर किंवा नालीत टाकणे आणि ती नाली चोक झाली की कारपोरेशनने स्वच्छ केली नाही म्हणून आपणच ओरडणे हे कितपत योग्य म्हणावे ? हेच लोक मात्र विदेशातील शिस्त आणि स्वच्छतेचे कौतुक करतात. सार्वजनिक स्वच्छतेविषयी कौटिल्याने सुद्धा अनेक कायदे आणि शिक्षा त्याच्या राज्यशास्त्रात सुचविल्या आहेत. आजही कारखान्यातील सांडपाणी, हॉस्पिटलचे वेस्टेज याविषयी स्पष्ट सूचना आणि कायदे आहेतच. प्रत्यक्ष अंमलात किती येतात, ते मोडणाऱ्यांवर किती कारवाई होते याविषयी न बोलणेच बरे. सर्वांना पावन आणि शुद्ध करणाऱ्या प्रत्यक्ष गंगानदीलाच करोडो रुपये खर्च करून शुद्ध करण्याची वेळ येते यावरून काय ते समजावे. ‘राम तेरी गंगा मैली’ हे राज कपूरच्या चित्रपटाचे नाव आता अन्वर्थक वाटू लागेल आहे.

बंधनात न राहणे ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. सुमारे ५० वर्षांपूर्वी धार्मिक बंधनांविषयी जी आपुलकी किंवा जो धाक होता तो आजच्या कायदेशीर बंधनांना राहिला नाही. आपल्या थोर पूर्वजांनी घालून दिलेले स्वच्छतेचे, खानपानाचे, दैनंदिन शुचितेचे किंवा स्पृश्यास्पश्यतेचे नियम बऱ्याच अंशी पाळल्या जात. कारण त्यात पापपुण्याची भिती होती. ही भिती ओसरली कारण ते पापपुण्याचे परिणाम मरणोत्तर भोगायचे असे सांगितले गेले. ते परिणाम जिवंतपणी तरी अदृश्य होते. मात्र आहे हे नियम मोडण्याचे प्रत्यक्ष वैद्यकीय परिणाम दिसत अनूनही आपण मात्र नियमांची अवहेलना करत आहोत. स्वतःबरोबरच संपूर्ण समाजाला संकटाक टाकत आहोत हे भान तथाकथित सुशिक्षित लोकही विसरत आहेत.

आजच्या या जागतिक संकटावर मात करायची असेल तर हायजिन आणि आयसोलेशन पाळणे भाग आहे.

**श्रीरंग हिर्लेकर,** अमरावती
९४२२१११८९३

९९७५६२२६९६
९०२८८५०३७३

*With best compliments from...*



करंबेळकर यांचे हॉटेल

# अभिरुची

लंच होम ॲण्ड स्नॅक्स

व्हेज

**ऑर्डरप्रमाणे उकडीचे मोदक व पुरणपोळी मिळेल.**

शॉप नं. ३, २२५, सोमवार पेठ, नगर वाचनालयासमोर,
राजवाडा परिसर, सातारा ४१५ ००२

# इतिहासातील कऱ्हाडे

रघुनाथ हरि नेवाळकर हे नेवाळकर घराण्याचे मूळ पुरुष. इतिहासात त्यांच्या नावाला विशेष महत्त्व आहे. झाशीच्या राणी याच घराण्यातील. पानिपतच्या लढाईत मराठ्यांना अपयश आल्यावर त्यांच्या विरोधकांनी ही संधी साधून उत्तर हिंदुस्थानातील मराठी अंमल उठवून देण्याचे जबरदस्त प्रयत्न सुरु केले. परंतु त्यांचे हे प्रयत्न यशस्वी होऊ न देता अत्यंत कठीण परिस्थितीत उत्तरेत मराठी राज्य टिकवून ठेवण्याचे महान कार्य ज्या अनेक कऱ्हाडे पुरुषांनी करून दाखविले त्यात रघुनाथ हरि नेवाळकर, गणेश संभाजी खांडेकर तसेच त्यांचे बंधू गोपाळ संभाजी आणि सागरच्या गोविंदपंत खेरांचे दोन्ही सुपुत्र बाळाजी व गंगाधर यांची नावे प्रामुख्याने घेतली जातात. बुंदेलखंडात मराठी अंमल टिकविण्याचे सारे श्रेय केवळ याच पराक्रमी कऱ्हाडे पुरुषांचे आहे.

पानिपतातील अपयशाने मराठी राज्य संपेल असा काही जणांचा अल्पकाळ समज झाला होता. आपल्या रणशौर्याने आणि मुत्सद्देगिरीने या मंडळीनी तो साफ नाहीसा केला. विसाजी गोविंद चांदोरकर यांच्या युद्धनिती व राजकारणातील मुत्सद्देगिरिने ते पुढे नावारूपाला आले.

रघुनाथपंत हरि नेवाळकर यांचे वास्तव्य झाशीला होते. यमुनेच्या पलीकडे इंग्रजांची छावणी होती. तेथे वारंवार जाऊन त्यांनी इंग्रजांच्या ओळखी करून घेतल्या. इंग्रजांचे सामर्थ्य हिंदुस्थानात वाढविणाऱ्या गोष्टींचा अभ्यास केला. त्याची कारणे त्यांनी समजून घेतली. त्यासाठी ते इंग्रजी भाषा व इंग्रजी विद्याभ्यास शिकले. शास्त्रीय प्रयोगांची साधने व उपकरणे गोळा केली. तोफा व शस्त्रे कशी तयार करतात याची कला समजून घेतली. अनेक पुस्तके व ग्रंथ जमवून त्यांचे पुस्तकालय तयार केले. इंग्रजी शब्दकोश व ज्ञानकोश वगैरे ग्रंथ त्यात होते. महाराष्ट्रातील इंग्रजी भाषा बोलणारे व लिहिणारे पहिले गृहस्थ म्हणजे रघुनाथ हरि नेवाळकर होय.

नाना फडणीसांच्या समवेत इंग्रजी जाणणारी कोणीही व्यक्ती नव्हती. इंग्रजांसमवेत एखादे महत्त्वाचे कार्य करताना परका दुभाषा आणावा लागे. आणि ही गोष्टी लगेच षटकर्णी होई. रघुनाथपंतांनी हे वैगुण्य ओळखून ते दूर करण्याचा प्रयत्न केला. १७९४ साली एका गंभीर व्याधीने ते आजारी पडले. आजार सहन न झाल्याने अखेर गंगेत त्यांनी जलसमाधी घेतली.

त्यांच्यानंतर त्यांचे बंधू शिवराम हरि नेवाळकर झाशीचे कारभारी झाले. शिवराम हरिंना दोन मुलगे होते. एक रामचंद्र आणि दुसरा गंगाधर. या दोघांनीही झाशीचा कारभार व्यवस्थित सांभाळला व जनतेचे प्रेम संपादन केले. शिवरामांची पत्नी म्हणजे राणी लक्ष्मीबाई होय. सत्तावनच्या रणसंग्रामात स्वतःला झोकून देऊन त्यांनी समरांगणावर जो पराक्रम केला त्याची कीर्ती आजही गौरविली जाते. या युद्धात त्यांना वीरगती प्राप्त झाली.

संभाजीराजेंच्या जवळची कऱ्हाडे व्यक्ती म्हणजे केशवभट पुरोहित. संभाजीराजेंच्या वधानंतर राजाराम राजे रायगडावरून निघून पन्हाळगड मार्गे जिंजीला गेले. त्यांच्या समवेत केशवभट पुरोहितही होते. त्यांनी राजाराम राजेंच्या ह्या प्रवासाचे वर्णन संस्कृतमध्ये लिहून ठेवले आहे. त्यांचे हे लिखाण पुढे इतिहासाच्या दृष्टीने फार मोलाचे ठरले.

औरंगजेब बादशहाने मावळ प्रांतावर हल्ले करून तेथील किल्ले हस्तगत करण्याचा सपाटा लावला होता. सह्याद्रीच्या पाटाखालील कऱ्हाडे घराण्यांशी त्याचा सामना झाला. पंडित ऊर्फ जेमेनीस, मावळकर, सरदेसाई, सरदेशपांडे, सबनीस ऊर्फ सरपोतदार आदी कितीतरी कऱ्हाडे घराणी आपल्या पराक्रमाने इतिहासात प्रसिद्ध झाली आहेत. या सर्व घराण्यांनी एकजुटीने राहून बादशहाचा पाडाव केला आणि वतने मिळविली. ती त्यांच्या वरील उपनावात आढळतात.

पेशव्यांकडे अनेक कऱ्हाडे मंडळींना ब्रम्हेंद्र स्वामींमुळे मोठा मान होता. स्वामींचा सर्वच सरदार आदर करीत

असत. त्यामुळे तांबे, भागवत, मोघे वगैरे घराणी राज्याच्या उद्योग व्यवसायात सामील झालेली आढळतात.

बाजीरावाने बंगसावर स्वारी करून विजय मिळविला. त्या प्रसंगात एकाएकी जोरदार पाऊस पडून कोणासही भोजन मिळाले नाही. बाजीरावांनी आपल्या शागिर्द गोविंद पंत खेरांजवळ, 'आज भोजनाची रे काय व्यवस्था ?' अशी विचारणा केली. 'आपल्या पुरता भात शिजवून ठेवला आहे महाराज,' गोविंदपंतांनी उत्तर दिले. 'अरे पण या पाऊसात तुला विस्तव कोठून मिळाला ?' असे बाजीरावांनी विचारताच. गोविंदपंतांनी, पलीकडे एक प्रेत जळते आहे. त्यावर भाताची एक लहान तपेली शिजवून आणल्याचे सांगितले. त्यावरून बाजीरावांनी जाणले की आपला शागीर्द हा हुशार व स्वावलंबी आहे. पुढे बाजीरावांनी त्यांना बुंदेलखंडाच्या कारभारावर नेमले. हेच पुढे गोविंद पंत बुंदेले म्हणून प्रसिद्धीला आले.

गोविंदपंतांनी सागर शहर वसविले. तेथे कोकणातील अनेक कऱ्हाडे कुटुंब नेऊन त्यांची सोय केली. त्यामुळे आजही सागर शहरात अनेक कऱ्हाडे मंडळींचा भरणा आढळतो. पानिपतानंतर पेशवे थोरले माधवराव राज्यकारभार पाहू लागले.

त्यांच्या पदरी महादजी बल्लाळ गुरुजी, विसाजी कृष्ण बिनीवाले वगैरे अनेक नामांकित कऱ्हाडे मंडळी होती. स्वपराक्रमाने आणि हुशारीने त्यांनी पेशव्यांचा विश्वास संपादन केला होता. महादजीपंत यांचे उपनाव करकरे होय. ते अत्यंत निःस्पृह व कडक वृत्तीचे म्हणून प्रसिद्ध होते. लाचलुचपत अथवा वशिला वगैरे त्यांना चालत नसे. त्यांच्या या गुणांमुळे लोक त्यांना मान देत. माधवराव पेशव्यांनंतर त्यांनी नाना फडणीसांना ही अनेक कामांत मदत केली. ते नानांचे अत्यंत विश्वासू सहकारी होते. म्हणूनच त्यांना नानांचा उजवा हात म्हटले जाई.

माधवराव पेशव्यांनी दिल्लीवर फौजा पाठवून हिंदुपतपातशाहीचा पूर्वजांचा संकल्प पुरा केला. त्या स्वारीचे आधिपत्य विसाजी कृष्ण चिंचाळकर या कऱ्हाडे व्यक्तीकडे होते. विसाजी पंतांनी नानासाहेब पेशव्यांच्या वेळेस कर्नाटक प्रांत जिंकून आपल्या कुशल नेतृत्वाची व शौर्याची जाणीव करून दिली. त्यामुळेच त्यांना बिनीवाले हे उपनाव प्राप्त झाले.

**विजय आंबर्डेकर,** मुंबई
९८१९८८५६६५


*With best compliments from...*

**प्रोप्रा. सौ. वैदेही करंबेळकर**
**९४२३१३६४८१**

# आर्या फूड प्रॉडक्टस्

**२२, व्यंकटपुरा पेठ, सातारा**





*** उत्पादक ***

**दर्जेदार, स्वादिष्ट व रुचकर शेंगदाणा, डिंक, ड्रायफ्रूट, खजूर**
**खजूर डिंक, नाचणी कोको लाडू व पाचक सुपारी. याशिवाय दिवाळी फराळ**


*** वितरक ***

**मे. बी. ए. काटदरे, सातारा, अग्रज फूड, कर्वेनगर व पद्मनाभ एंटरप्रायजेस, कृष्णा हॉस्पिटलजवळ, पुणे**

# लता मंगेशकरांचा स्वरसुगंध व त्यांच्या नावाचा ‘परफ्यूम’

### (आणि त्यांच्यावरील कट्यारीचा फसलेला प्रयोग)

जगप्रसिद्ध पार्श्वगायिका लता मंगेशकर यांना येत्या २८ सप्टेंबरला ९१ वर्षे पूर्ण झाली आहेत. ब्रह्मदेव आणि सरस्वती यांनी खूप विचारपूर्वक निर्माण केलेले हे एक अद्‌भुत स्वरशिल्प ! त्यांच्या सुरुवातीच्या काळात अनेक तत्कालीन नामवंत पंडित आणि खाँसाहेबांनी, लतादीदींबद्दल काहीशा असे उद्‌वेगाने म्हटले होते की, ‘कंबख्त, ये भी सुरोंमे गलती करतीही नही !’




लतादीदींना किती संपन्न वारसा लाभला होता ! आजोबा गणेशभट नवाथे (हर्डीकर) हे स्वतः गोवाधिपती श्री मंगेशाचे अभिषेकी, तर आजी येसूबाई या संगीतसंपन्न ! आईचे वडील शेठ हरिदास रामदास हे श्रीमंत गुजराती जमीनदार आणि व्यावसायिक होते. वडील दीनानाथ मंगेशकर हे तर खुद्द स्वतःच संगीतातील एक मोठे घराणे म्हणावे इतके संगीतसंपन्न ! महाराष्ट्राच्या नाटक आणि संगीत क्षेत्राला अनेक भरजरी अलंकार चढविणाऱ्या दीनानाथांचे वयाच्या अवघ्या ४२ व्या वर्षी निधन झाले. त्यावेळी लतादीदी फक्त तेरा वर्षांच्या होत्या. पुढचा प्रवास कठीण होता. त्या सर्वात मोठ्या आणि अन्य ४ भावंडे व आई असे मोठे कुटुंब होते. त्या जेव्हा या गायन/चित्रपट क्षेत्रात आल्या तेव्हा या क्षेत्राची आणि त्यांच्या कुटुंबाची खूपच मोठी विचित्र परिस्थिती होती. काहीशा जाड्या आवाजाच्या आणि मुस्लिम पद्धतीची, अनुनासिक गायकी जपणाऱ्या गायिकांचे संगीतक्षेत्रात वर्चस्व होते. त्यांच्या आवाजापुढे लतादीदींचा आवाज हा अतिशय कोमल आणि बारीक (पतला) म्हणून त्यांना चक्क नाकारले गेले होते. पण सोने ते सोनेच असते हे नंतर सिद्ध झाले. सूर, स्वर, संगीत, चित्रपट, बॉलिवूड म्हणजे फक्त लता मंगेशकर. हे नंतर पक्के झाले !

एक आख्यायिका बनून राहिलेल्या लतादीदींच्या आयुष्यामध्ये अत्यंत वेगळ्या, अभूतपूर्व वाटाव्यात अशा कितीतरी गोष्टी घडल्या आहेत. त्यातील काही गोष्टी आपण पाहुया. लतादीदींचे नाव म्हणजेच चित्रपट संगीत असे समीकरण जरी झाले असले तरी त्यांच्या आयुष्यातील पहिलेच चित्रपट गीत हे चित्रपटातूनच चक्क कापण्यात आले होते. तर त्यांचे जे पहिले मराठी गीत पडद्यावर आले त्याच चित्रपटात त्यांनी छोटेसे कामही केले होते. त्यांचे पहिले हिंदी चित्रपट गीत हे मराठी चित्रपटात गायलेले होते. त्यांचे असेच काही वेगळे विक्रम पाहू या.

१) त्यांनी गायलेले पहिले आणि चित्रपटातूनच कापून टाकलेले गीत - नाचू या गडे, खेळी सारी मनी हौस भारी. मराठी चित्रपट - किती हसाल (१९४२)

२) त्यांचे पहिले चित्रपट गीत आणि भूमिका केलेला चित्रपट - नटली चैत्राची नवलाई - चित्रपट - पहिली मंगळागौर (१९४२) - https://www.youtube.com/watch?v=TJ1bFxlezhs

३) पहिले हिंदी चित्रपट गीत, हे मराठी चित्रपटात गायलेले होते - चित्रपट - गजाभाऊ (१९४३) - https://www.youtube.com/watch?v=KPK4W78_w5E

४) हिंदी चित्रपट सृष्टी म्हणजे बॉलिवूड आणि इंग्रजी चित्रपट सृष्टी हॉलिवूड या दोन जगातील सर्वात मोठ्या

चित्रराजवटी ! बॉलिवूडच्या या स्वरसम्राज्ञीने हॉलिवूडच्या इंग्रजी भाषेत खूप गाजलेले पण फक्त एकच गीत गायले आहे. सुप्रसिद्ध गायिका ॲन मरे हिचे प्रसिद्ध गाणे 'यू निडेड मी' हे गीत (याला केवळ युट्युबवरच ९१ लाख प्रेक्षक लाभले आहेत) तिच्याच विनंतीवरून लता मंगेशकर यांनी गायले आहे, या कार्यक्रमाच्या सुरुवातीला लतादीदींचा उल्लेख गंमतीने जेव्हा ॲन मंगेशकर असा केला गेला तेव्हा खुद्द लतादीदींनाच हसू आवरले नाही. त्यांनी गाण्याची सुरुवात केल्यावर आणि गीत संपल्यावर हॉलमध्ये झालेला टाळ्यांचा कडकडाट ऐकून आपल्यालाही आनंद होतो. लतादीदींचा आवाज इंग्रजी गीतात इतक्या वर चढतो की, तो बहुधा मूळ इंग्रजी रसिकांनी प्रथमच अनुभवला असावा. या सर्व गोष्टी आपल्याला खालील लिंकवर अनुभवता येतील.

ॲन मरे हिच्या मूळ गीताची लिंक - https://www.youtube.com/watch?v=e6nfpxZ2Nz4

लताबाईंनी गायलेल्या गीताची लिंक - https://www.youtube.com/watch?v=HXfRBRaJ9g

५) सर्वोच्च अपमान आणि सर्वोच्च सन्मान : असे म्हणतात की लतादीदी लौकिक अर्थाने फक्त एकच दिवस शाळेत गेल्या. पण त्यांना जगातील न्यूयॉर्कसह ६ प्रतिष्ठित विद्यापीठांनी मानद पदव्या देऊन आपल्या विद्यापीठाचा सन्मान वाढविला आहे. संगीतकार गुलाम हैदर हे लतादीदींना त्या काळचे नामवंत दिग्दर्शक शशधर मुखर्जी यांच्याकडे घेऊन गेले. तेव्हा त्यांनी लतादीदींचा आवाज फारच पातळ आहे असे सांगून नाकारला. त्याचवेळी गुलाम हैदर यांनी संतापून त्यांना सांगितले की, उद्या तुम्ही गाण्यासाठी लतादीदींचे पाय धरायला याल. लतादीदींकडून आज अगदी प्रेमाने राखी बांधून घेणाऱ्या दिलीपकुमार यांनी सुरुवातीला त्यांच्याबद्दल ''इसके हिंदी और उर्दू गानों मे मराठी की बू आती है'' असे उद्‌गार काढले होते, पण भारतीय शास्त्रीय संगीताचा अत्यंत उत्तम वापर करणारे नौशाद हे मात्र आपली सगळी सांगितिक कारकीर्द, लतादीदींच्या ''है इसी में प्यार की आबरू'' या एकाच गझलवरून ओवाळून टाकायला तयार होते. अर्थात यात संगीतकार मदनमोहन यांचा मोठा वाटा आणि नौशाद यांचा मोठेपणा होता. या लतादीदींना शेकडो पारितोषिके, सन्मान मानद पदव्या आणि उदंड कीर्ती लाभली. भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान ''भारतरत्न'' ही त्यांना लाभले.

६) लतादीदींवर 'कट्यार'चा प्रयोग : 'कट्यार काळजात घुसली' या मराठी नाटकात, राजगायक असलेल्या पंडितजींचा गायकीमध्ये पराभव करण्याऐवजी विरोधक त्यांच्यावर रासायनिक प्रयोग करून त्यांचा आवाज घालवितात, अशी घटना आहे. १९६२ मध्ये लतादीदींवर असा प्रयोग झाल्याचे, त्यांच्या विकिपीडियातील परिचयामध्ये म्हटले आहे, त्यांना स्लो पॉयझनिंग व्हावे असे विष घातले गेले होते. त्यामुळे त्या खूप गंभीर आजारी झाल्या. वेदना आणि विषप्रयोग यामुळे त्या सुमारे ३ महिने अंथरुणाला खिळून होत्या. पण वैद्यकिय उपचार, मंगेशाची कृपा आणि आपले सुदैव यामुळे त्या त्यांचा आवाज सुरक्षित राहून बऱ्या झाल्या. पुन्हा अधिक जोमाने गायल्या. या घटनेनंतर त्यांचा स्वयंपाकी गूढपणे गायबच झाला. हे वाचल्यावर असा विचार येतो की, १९६७ मध्ये रंगमंचावर आलेल्या 'कट्यार काळजात घुसली' या अजरामर मराठी संगीत नाटकाची कल्पना, लेखक पुरुषोत्तम दारव्हेकर यांना या प्रसंगावरून तर सुचली नसेल ?

७) चित्रपट सृष्टीतील तीन पिढ्यांमधील आणि बहुतेक सर्व नायिकांसाठी लतादीदी गायलेल्या आहेत. सुमारे २० भाषांमध्ये जवळजवळ ३०००० हून अधिक गीते त्यांनी म्हटली आहेत. पण त्याचा अचूक तपशील त्यांनी ठेवलेला नाही. त्यांनी कुठलीही मागणी केलेली नसूनही गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने १९७४ मध्ये त्यांच्या नावे हा विक्रम आपणहून नोंदविला. नंतर १९९१ मध्ये गिनीज बुकनेच हा विक्रम काढून टाकला. ही एक अजबच गोष्ट म्हणायला हवी.

८) त्यांच्या आवाजाची परिणामकारकता खूपच अचंबित करणारी होती. ''ऐ मेरे वतन के लोगो'' हे त्यांचे गीत ऐकतांना खुद्द पंडित नेहेरुंच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले होते.

९) आणखी एक अचंबित करणारी गोष्ट म्हणजे लतादीदींनी, अॅडोरा या हिरे निर्यात कंपनीसाठी २००५ मध्ये, स्वरांजली या नावाचा हिऱ्यांच्या दागिन्यांचा सेट डिझाईन करून दिला होता. या सेटचा ख्रिस्ती या जगप्रसिद्ध लिलाव कंपनीने १,०५,००० पौंड इतक्या प्रचंड किंमतीला विकला आणि ती रक्कम काश्मीरच्या भूकंपग्रस्तांच्या मदत निधीला देण्यात आली.

१०) हिंदी गीतांसाठी सर्वोत्कृष्ट गायिकेचा फिल्मफेअर अनेकदा जिंकल्यावर, लतादीदींनी १९६९ मध्ये पुरस्कार समितीला, नव्या गायिकांसाठी या पुढे आपला पुरस्कारासाठी विचार करू नये असे सांगितले.

११) विदेशी टपाल तिकीट - भारतीय टपाल खात्याच्या आजवरच्या प्रथेप्रमाणे जिवंत व्यक्तीवर टपाल तिकीट काढले जात नाही. याला अपवाद फक्त... डॉ. विश्वेश्वरय्या, महर्षी कर्वे, राजीव गांधी, मदर तेरेसा आणि सचिन तेंडुलकर ! पण विदेशात असे नियम नसल्याने साओ टोम अँड प्रिंसीप या आफ्रिकेतील देशाने २००९ मध्ये भारतीय चित्रपट सृष्टीतील अनेक मान्यवरांवर टपाल तिकिटे प्रसिद्ध केली होती. अर्थातच त्यात लता मंगेशकर (आणि आशा भोसले) यांचा समावेश होता.

१२) आता त्यांना ९१ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजे लगेच त्यांचे शेवटचे गीत कोणते याची चर्चा सुरु झाली आहे. गेल्या वर्षी ३० मार्च रोजी त्यांनी ''सौगंध मुझे इस मिट्टीकी'' हे आपल्या सैनिकांना आणि देशाला अर्पण केलेले सुंदर गीत हेच तर्तू तरी शेवटचे असावे. ते आजवर युट्युबवर ११ लाखाहून अधिक लोकांनी ऐकले आहे. (त्यांनी गायलेल्या ''आता विसाव्याचे क्षण'' या मराठी गाण्याची चर्चा होती पण ते खरे नाही ) त्याची लिंक - https://www.youtube.com/watch?v=TNluTc0OAGg

१३) दंतकथा आणि चमत्कार वाटावा अशा या लतादीदींच्या नावाने एक सुंदर फरफ्युम बाजारात आला होता. विदेशात अशा सुप्रसिद्ध कलावंतांच्या नावाने बाजारात विविध वस्तू आणण्याचा प्रघात आहे. आपल्याकडील अमिताभ बच्चन यांच्या नावे एक परफ्यूम आला होता. अमिताभ यांच्या नावे आला म्हणजे लगेचच, स्वतःला सुपरस्टार समजणाऱ्या शाहरूख खानच्या नावाचाही आला. पण लतादीदींच्या नावाचा LATA EAU DE PARFUM हा परफ्युम मराठी उद्योजक श्री. दीपक काणेगावकर यांच्या गंधसुगंध या कंपनीने तयार केला होता. परफ्युमच्या दुनियेत Eau De Cologne, Eau De Toilette आणि Eau De Parfum असे प्रकार येतात. त्यात Eau De Parfum हा प्रकार अत्यंत उच्च दर्जाचा असतो. तसेच हा परफ्युम देखील लतादीदींच्या संगीतातील सर्वोच्च स्थानाला साजेलसा आहे. यासाठी लागलेला सर्व कच्चा माल, त्याचे कंटेनर्स, पॅकिंग हे सर्व सर्वोच्च आणि फ्रान्समधून आयात केलेले होते. सुगंधामध्ये ताजेपणा, त्याचा दरवळ, रेंगाळणारा धुंद गंध या गोष्टींसाठी या परफ्युममध्ये सर्वोत्तम आणि शुद्ध असे ७८ प्रकारचे विविध घटक वापरलेले होते. लतादीदी विविध छटांची गीते जशी अत्यंत अप्रतिमपणे गातात तसे या एकाच परफ्युममध्ये जाई, गुलाब, चंदन, कस्तुरी, अंबर, व्हॅनिला अशा अनेक सुगंधांचे मिश्रण होते. या परफ्युमचे ज्या कार्यक्रमामध्ये लतादीदींच्या हस्ते अनावरण करण्यात आले त्या कार्यक्रमाला हजर राहण्याचे सदभाग्य मला लाभले होते. तेव्हा आम्हाला या परफ्युमची छोटी कुपी स्नेहभेट म्हणून देण्यात आली होती.

१४) आता आणखी एका चमत्काराची अपेक्षा आहे. लतादीदींच्या शतायुष्य लाभावे आणि त्यांनी १०० व्या वर्षी एक गीत गाऊन आपला सांगितिक प्रवास थांबवावा. हा सुद्धा एक जागतिक चमत्कार ठरेल !

असा चमत्कार घडू देच, अशी परमेश्वराला आग्रहाची विनंती आणि लतादीदींना हार्दिक शुभेच्छा !

**मकरंद करंदीकर**, पुणे

## **कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली,** जि. ठाणे

समाज मंदिर, टिळकनगर विद्यामंदिर पथ, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१

न्यासाचा नोंदणी क्रमांक-ई-४३८ (ठाणे) ७२

दि. ११ ऑक्टोबर १९७१ : विजयादशमी - वर्धापन दिवस

**संस्थेमध्ये वर्षभरात पुढीलप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.**

१) **वासंतिक संमेलन** : एप्रिलमध्ये अंबरनाथ येथे केले जाते.

२) **बालक-पालक मेळावा** : डोंबिवली येथील समाजमंदिर सभागृहात जुलैमध्ये आयोजित करण्यात येतो.

३) **कांदे-नवमी** : डोंबिवली येथील समाजमंदिर सभागृहात जुलैमध्ये साजरी केली जाते.

४) **वर्षा सहल** : जुलै-ऑगस्ट महिन्यात याचे आयोजन करण्यात येते.

५) **वर्धापन दिन** : संस्थेचा वर्धापन दिन समाजमंदिर सभागृहात विजयादशमीला साजरा करण्यात येतो.

६) **शारदीय संमेलन** : कल्याण येथे ऑक्टोबर महिन्यात साजरे करण्यात येते.

७) **लक्ष्मीपूजन व दिवाळी पहाट** : लक्ष्मीपूजन सर्व ज्ञाती बांधव एकत्र येऊन साजरे करतात. दीपावलीत लक्ष्मी पूजनाच्या दिवशी किंवा पाडव्याच्या दिवशी सकाळी समाजमंदिर येथील सभागृहात स्नेहबंध ह्या दीपावलीबद्दल एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

८) **सहल** : डिसेंबरमध्ये सहलीचे आयोजन करण्यात येते.

९) **संक्रांत संमेलन** : समाजमंदिरमध्ये जानेवारी महिन्यात साजरे केले जाते.

**संस्थेतर्फे सर्व समाजासाठी राबविण्यात येणारे उपक्रम :**

१) शैक्षणिक मदत, शिक्षण दत्तक योजना २) वैद्यकीय मदत ३) कुटुंब कल्याण योजना

४) दानव्रत प्रकल्प ५) वधू-वर सूचक केंद्र

| **क्र.** | **संचालकाचे नांव** | **जन्म तारीख** | **फोन/मोबाईन नं.** |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुहास मनोहर पंडित (अध्यक्ष) | २२/०८/१९५३ | ९८३३३०४०३३ |
| २. | श्रीम. क्षमा सुहास धामणकर (उपाध्यक्ष) | ०१/०८/१९४८ | ९९६९६३०८६१ |
| ३. | श्री. नितीन सदानंद शेंबेकर (सहकार्यवाह) | ०४/११/१९६६ | ९८२००४३२४४ |
| ४. | श्री. अशोक शंकरराव भागवत (कोषपाल) | १०/०५/१९३८ | ९८३३६८४१०० |
| ५. | श्री. संदीप सुरेश पुराणिक (कार्यवाह) | ३०/०८/१९७७ | ९३२००२४३०० |
| ६. | श्री. विनायक दिगंबर जांभेकर (सहकार्यवाह) | १६/०८/१९६३ | ९८१९५०४५९२ |
| ७. | श्री. प्रदीप श्रीराम हळबे | ०९/०७/१९५६ | ९८३३१६३६५९ |

**संस्थेचे कार्यक्षेत्र** : डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ आणि बदलापूर

**संस्थेची स्वत:ची वास्तू** : ‘समाज मंदिर’ कार्यालय, डोंबिवली

## कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ डोंबिवली, जि. ठाणे

समाज मंदिर, टिळकनगर विद्यामंदिर पथ, टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१ २०१

न्यासाचा नोंदणी क्रमांक-ई-४३८ (ठाणे) ७२

कोरोना संकटकाळात सेवा मंडळाने खालीलप्रमाणे अर्थसहाय्य केले आहे.

१) **शैक्षणिक मदत** - रु. १०,०००/-

* भूषण नंदकुमार नारगोळकर एस.सी.सी. मध्ये ९४.२०% गुण प्राप्त.

२) **वैद्यकीय मदत** - रु. ३७,०००/-

* श्री. अभिजीत आनंद सरपोतदार - १०,०००/-
* श्री. सुभाषचंद्र चव्वाथे - ५,०००/-
* सौ. प्रिती सुभाषचंद्र चव्वाथे - ५,०००/-
* श्रीमती रेखा बापट - ५,०००/-
* श्री. नारायण परांजपे - २,०००/-
* श्री. वासुदेव जांभळे - १०,०००/-

## कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे सन २०१९-२०२० मधील अर्थसहाय्य


| **वैद्यकीय मदत** | **रु. २,८५,०००/-** |
|---|---|
| १) श्री. प्रसन्न मुणगेकर | २५,०००/- |
| २) श्री. दामोदर भट | २०,०००/- |
| ३) श्री. अरुण अगवेकर | १५,०००/- |
| ४) श्री. राजगोपाल भट | २०,०००/- |
| ५) श्री. अरविंद कुमार भट | २५,०००/- |
| ६) श्री. श्रीहरी भट | २०,०००/- |
| ७) श्री. राधाकृष्ण भट | २०,०००/- |
| ८) श्रीम. पी. आय. भाव्येश्री | २५,०००/- |
| ९) श्री. एस. एस. टीकेकर | २५,०००/- |
| १०) श्री. गणपती भट | २०,०००/- |
| ११) श्री. वेंकटरमण भट | २०,०००/- |
| १२) श्री. प्रेमवीणा भट | २०,०००/- |
| १३) श्री. प्रकाश नाखरे | २०,०००/- |
| १४) श्रीम. गीतांजली खांडेकर | १०,०००/- |

| **शैक्षणिक मदत** | **रु. १,८५,०००/-** |
|---|---|
| १) श्री. सुधीर हर्डीकर | २०,०००/- |
| २) श्री. नरेंद्र टेंबे | २०,०००/- |
| ३) श्री. सुहास शेवडे | १५,०००/- |
| ४) श्री. अमिलडी हर्षे | २०,०००/- |
| ५) श्री. विघ्नेश भट | २५,०००/- |
| ६) श्री. वेंकटेश धोपेश्वरकर | १५,०००/- |
| ७) श्री. सतीश गुर्जर | २०,०००/- |
| ८) श्री. अविनाश मणेरीकर | २०,०००/- |
| ९) श्री. आनंद भाटे | ३०,०००/- |

वरील सर्व लाभार्थींना महासंघाच्या कोअर कमिटीद्वारे मान्यता देण्यात आली.

# वेक अप कॉल

निसर्गाच्या उदरात काय दडले आहे याचे कोडे अनादिअनंत काळापासून कधीच कुणाला सुटले नाही; कधीच कुणाला उमगले नाही. आज कोरोनाच्या संकटाने संपूर्ण जगालाच वेठीस धरले आहे. या वैश्विक महामारीने सारे जग धास्तावले आहे. या विषाणूची निर्मिती चीनच्या एखाद्या प्रयोगशाळेत करण्यात आली की तो विषाणू एखाद्या प्राण्याकडून माणसामध्ये संक्रमित झाला. याबद्दल जगभरच्या शास्त्रज्ञांमध्येही मतैक्य नाही. तथापि, या विषाणूची कोणीही निर्मिती केली नसून तो निसर्गात पहिल्यापासून अस्तित्वात आहे, असा तज्ज्ञांचा निष्कर्ष असल्याचेही जागतिक आरोग्य संघटनेने नुकतेच म्हटले आहे. यबाबतचे वास्तव भविष्यात लवकरच जगासमोर येईल. तिसऱ्या महायुद्धाची ही नांदी तर नसेल ना अशी भिती मात्र मनाला स्पर्शून जाते. शेवटी काय 'भय इथले संपत नाही' !




माणसाला माणसाची भिती वाटावी, रक्ताची नाती पातळ व्हावीत, अशा या विषाणूचे भारतातही आगमन झाले असून त्याने आपले रौद्र रुप दाखवायला सुरुवात केली आहे. या वैश्विक संकटावर मात करण्यासाठी आपण सज्ज झालो आहोत. केंद्र व राज्य शासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून आपला देश समर्थपणे हे आव्हान पेलीत आहे. लॉकडाऊन, सोशल डिस्टन्सिंग, मास्कचा वापर, घरात रहा, सुरक्षित रहा, सॅनिटायझरचा वापर, हात सातत्याने धुणे, आहार, विहार, व्यायाम, अकारण फिरण्यावर बंदी, वाहनाचा मर्यादित वापर अशा विविध उपाययोजना, सूचना, मार्गदर्शन प्रशासनाने करून सुद्धा अनेक ठिकाणी या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे पहायला मिळाले. खरे तर एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून घरातच राहून आपण प्रशासनाला मदत करायला हवी जेणेकरून प्रशासनावरचा अतिरिक्त कामाचा ताण कमी होईल. याबाबतीत जपानी लोकांची शिस्त आणि प्रसंगानुरुप वागण्याचा त्यांचा स्वभाव कौतुकास्पद वाटतो. जपान हा मुळातच अतिशय शिस्तशीर देश आहे. आपण चांगल्या गोष्टींचे अनुकरण सातत्याने केले पाहिजे.

''वसुधैव कुटुंबकम्' म्हणजे विश्व' हे माझे घर आहे हे व्यापकत्व भारतीय संस्कृतीने सांगितले आहे. तथापि, कुटुंब दर्शनातूनच आता वैश्विकतेची अनुभूती घ्यायची आहे. घरातच निग्रहपूर्वक राहणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. कारण कुटुंब हे समरसतेचे प्रतिक असते. आज कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वांजवळ वेळच वेळ आहे. पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंबपद्धती सर्वत्र दृष्टोत्पतीस येत असे. आज मात्र बदलत्या जीवनमूल्यांच्या पार्श्वभूमीवर एकत्र कुटुंबपद्धतीचा हा मौलिक वारसा काळाच्या ओघात अस्त पावत चालाल आहे. कौटुंबिक नाती उसवत चालली आहेत. पूर्वीच्या काळी आजी-आजोबांची मांडी हेच प्रत्येकाच्या घरातील खरे संस्कारपीठ, ज्ञानपीठ होते. आपल्या विशाल संस्कृतीचा ठेवा नव्या पिढीकडे पोहोचविण्याची जबाबदारी आजी-आजोबांनी पार पाडली. आज वृद्धाश्रमांची संख्या वाढत आहे. आजच्या गतीमान आणि यांत्रिकी युगात माणसाची जीवनशैली बदलली आहे. विभक्त कुटुंबपद्धती झपाट्याने विस्तारत

आहे. प्रत्येकाच्या घरात आजी-आजोबा असतीलच असे नाही. तथापि, आई-वडिलांनी संतांची ओळख, त्यांचे कार्य, शिकवण, संत चरित्रातील गोष्टी तरुण पिढीस सांगणे अगत्याचे आहे. संत म्हणजे समाजाच्या प्रांगणातील मनाची प्रसन्नता वाढविणारी मानवतेची वृंदावने आहेत.

गुरुदेव रविंद्रनाथांच्या एका कवितेत एक माणूस गळ्यात लोखंडाची साखळी अडकवून परिसाचा शोध घेत हिंडत असतो. लोखंडाची साखळी सोन्याची करण्याचा त्याने ध्यास घेतला असतो. हाताला येईल तो दगड साखळीला लावून फेकत असतो. एका विशिष्ट तंद्रीत त्याचे हे कार्य चालू असते. पुढे गेल्यावर सहजपणे साखळीकडे त्याचे लक्ष जाते, तर साखळी केव्हाच सोन्याची झालेली असते. तथापि, एक गोष्ट मात्र काही केल्या त्याच्या लक्षात येत नाही की आपल्या हातातून हा परीस निसटून गेला तरी कधी ? आपले आयुष्य सोनेरी करणारे असे अनेक परीस पुस्तकाच्या रुपाने आपल्या अवती-भवती विखुरलेले असतात. आपण आवर्जुन त्यांच्या सहवासात गेले पाहिजे. मग आपल्यालाही कळणार नाही की आपले आयुष्य सोनेरी नि सुगंधित झाले कधी. लॉकडाऊनमुळे आज सर्वांच्याकडे वेळ आहे. ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध ह्यांच्यावरची धूळ झटकली पाहिजे. महापुरुषांची चरित्रे, आत्मचरित्रे आपले चारित्र्य घडवतात. उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करतात. दर्जेदार, सकस साहित्य वाचा. व्यापक दृष्टीकोन लाभेल. पुस्तकांची मैत्री हा माणसाच्या विश्वातला खरा भावनिक दिलासा असतो. सृष्टीतील फुले कोमेजतात पण साहित्यातील संस्कार उर्जा देते. संकटाला सामोरे जाण्याचे मनोबल देते. यासाठी ईश्वरी अधिष्ठान आवश्यक आहे. माणसाने धार्मिक आणि आध्यात्मिक साधनेने मन प्रसन्न ठेवायला हवे. सुख-दुःखाचा निर्माता हा माणूसच असतो. पूर्वी वाडा संस्कृतीत तिन्हीसांजेला तुळशीवृंदाजवळ बसून सर्वांनी एका सुरात म्हणलेली शुभंकरोति, रामरक्षा, भीमरुपी ,अथर्वशीर्ष, मनाचे श्लोक, करुणाष्टके, आरत्या आजही आम्हाला मुखोद्गत आहेत. वातावरणात निर्माण होणारा तो मांगल्याचा सात्विक परिमल, आजही त्या आठवणीने, आमच्या मनाची प्रसन्नता वाढवितो. देवापुढे नंदादीप, तुपाचा दिवा, कापूर, उदबत्ती, दूध-साखरेचा नेवैद्य, आरत्या यामुळे घरात सकारात्मक उर्जा निर्माण होते. वाईट शक्तींचा नाश होतो. वातावरण प्रसन्न राहते. बुद्धीला उंची असते, पण श्रद्धेला खोली असते. 'श्रद्धावान लाभते ज्ञानम्.'

प्रकृतीकडून विकृतीकडे जाणे सोपे आहे, पण प्रकृतीकडून संस्कृतीकडे जाणे अवघड आहे. पूर्वीच्या या परंपरा विसरून आम्ही आधी तुळशीला घराबाहेर काढलं! सूर्योदयापूर्वी शुचिर्भूत होणे ही संकल्पना लयास चालली आहे. वाट्टेल तेव्हा अंथरुणातून उठून शॉवरखाली दोन मिनिटं उभे राहणाऱ्या पिढीला आता दोन दोन मिनिटाला हात धुवावे लागत आहेत. काळाचा महिमा अगाध आहे. त्याला काय होतंय हा प्रश्न विचारणाऱ्या नवोदित पिढीला हा चांगलाच झटका आहे. घरी आल्यावर आधी हातपाय धुणारी आपली परंपरा, संस्कृती, संस्कार सोडून बुटासकट बेडवर लोळणारे आता चांगलेच धास्तावले आहेत. घरेच जेवण आम्ही विसरत चाललो आहोत. बाजारातील वडापाव, पिझ्झा, बर्गर, चायनीज फूड यांचे प्रस्थ वाढले. घरच्या सकस आहाराची गरज आता आमच्या लक्षात आली आहे. माणुसकी, स्वच्छता, कुटुंब व्यवस्था, व्यसनाधिनता, निकृष्ट जीवनशैली, पैशांचा अपव्यय, विलासीपणा, संस्कार, कृतज्ञता, ने ऐकून घेण्याची मानसिकता अशा अनेक गोष्टी शिकवायला आलेला हा एक वैश्विक संदेश आहे. ज्ञानेश्वरांनी 'अवघाची संसार सुखाचा करेन । आनंदे भरीन तिन्ही लोक ।' अशी प्रतिज्ञा केली. आपण आता आनंदासाठी मनोनिग्रह करू या. विज्ञान जिथे थांबते, तिथे अध्यात्म सुरु होते.

निसर्ग हे ईश्वराचे रुप आहे. पूर्वीही प्रलय, उत्पात झाल्याची उदाहरणे आणि त्यावर मात करण्यासाठी मानवाने केलेल्या प्रयत्नांची वर्णने आपण प्राचीन ग्रंथामधून वाचतो. दुष्काळ, महापूर, भूकंप, ज्वालामुखी, त्सुनामी

इत्यादी नैसर्गिक गोष्टी घडणे हा एक नैसर्गिक भाग आहे. 'कोरोना'पेक्षा महाभयंकर होतं स्पॅनिश फ्लूचं संकट. जेव्हा कुठल्याही गोष्टीचा अतिरेक होतो, अनेक गोष्टीमध्ये विषमता निर्माण होते, सृष्टीचक्रामध्ये काही वेगळ्या गोष्टी घडू लागतात तेव्हा अशा घटना घडतात. कोरोना व्हायरस हा निसर्गाने आपल्याला शिकविलेला एक धडा आहे. एक वैश्विक, नैसर्गिक चपराक आहे. निसर्गाने मानवाला धोक्याचा कंदील दाखविला आहे. हा 'वेकअप कॉल आहे.' निसर्गासाठी वेगळे काही करण्याची खरंच अजिबात गरज नसते. आपण फक्त निसर्गामध्ये फारशी लुडबुड न करणे हेच त्याच्यासाठी खूप काही केल्यासारखे असते. वसुंधरेचे संवर्धन करणे आणि निसर्गाचे चक्र अव्याहतपणे त्याच्या कलेने फिरेल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. निसर्गाला इतकं गृहित धरण आता आपल्याला परवडण्यासारखं नाही. विकासाच्या नावाखाली आज हजारो झाडे तोडायची आणि निसर्गाची हानी करायची. वने आणि वनचरे ही राष्ट्राची अनमोल संपत्ती आहे.

लॉकडाऊनमुळे यंदा प्रथमच वसुंधरेने मोकळा श्वास अनुभवला असावा. जंगलाचा, मोकळ्या जागांचा आणि वन्यसृष्टीचा नाश हे पर्यावरणासंदर्भातील प्रश्न इतक्या वर्षानंतरही आज कायम आहेत. प्रदूषणाचा प्रश्न तर आणखी भयंकर बनला आहे. लॉकडाऊन असल्याने तूर्त तरी प्रदूषण कमी झाले आहे. रस्त्यावर पूर्वीसारखी वाहनांची गर्दी दिसत नाही. प्रदूषण वाढविणारी धूरकांडेही आता बंद आहेत. नद्यांमध्ये सोडले जाणारे प्रदूषित पाणी सोडणे थांबले आहे. त्यामुळे निसर्गाचे मनोहर रूप, मूळ निसर्ग अनुभवायला मिळत आहे. पक्ष्यांच्या चिवचिवाटाने आपण आता साखर झोपेतून जागे होतो. पक्षांचे थवे मुक्त संचार करताना दिसतात. रस्त्यावर प्राण्यांची वर्दळ वाढली आहे. मोर कधी नव्हे इतके रस्त्यावर दिसत आहेत. माणसे घरात आणि प्राणी रस्त्यात. ईश्वरी लिला किती आघात आहे हे काही खोटे नाही. धूळ, प्रदूषण थांबल्याने इतर आजारपण आता कमी झाले आहेत. जीवनातल्या उत्कट आनंदाचे क्षण निसर्गाच्या कुशीत अनुभवता येतात. निसर्ग माणसाला भरभरून देत असतो. हे सत्य अनुभवाला येत आहे.

निसर्गाने आम्हाला सुधारण्याची संधी दिली आहे. आज 'कोरोना'शी आपण लढतो आहोत. उद्या आणखी कुठल्या तरी आजाराशी लढावे लागेल. निसर्गाच्या विरुद्ध जाऊन पुन्हा लढत बसायचे की निसर्गाशी जुळवून विकास साधायचा हे आपणच ठरवायचे आहे. वाढती लोकसंख्या, पायाभूत सुविधांची वानवा, लोकांना वास्तव्यासाठी ना पुरेशी जागा आहे, ना शुद्ध हवा, एकमेकांना खेटून असेलल्या झोपडपट्ट्या, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, धुम्रपान करणे, रस्त्यात कचरा टाकणे, वणवा लावणे, जाळपोळ करणे, यबाबत गांभिर्याने विचार करणे आता अत्यंत गरजेचे आहे. पर्यावरणास हानी पोहचेल अशी कृती करणाऱ्यांविरुद्ध आता कडक कारवाई केली गेली पाहिजे. स्वच्छ हवेची किंमत आम्ही आजही ओळखू शकत नसू तर भविष्यकाळ यापेक्षाही वाईट राहणार आहे, हे नक्की.

कृतज्ञता व्यक्त करणे हे सुसंस्कृत मनाचे द्योतक आहे. कोरोनाबाधित रुग्णाची सेवा करणारे, त्यांना या आजारातून जीवनदान देणारे डॉक्टर्स, नर्सेस, हॉस्पिटलमधील कर्मचारी तसेच या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कार्यरत असणारे प्रशासन, पोलीस कर्मचारी, सफाई कामगार अविरतपणे काम करीत असून त्यांच्या ऋणातून आपण कधीही उतराई होऊ शकणार नाही. हे सर्वजण आपले घर, कुटुंब सोडून रात्रंदिवस समाजसेवा करीत आहेत. त्यांचा आदर सत्कार करा. काही विघ्नसंतोषी, विकृत मनोवृत्तीची मंडळी डॉक्टरांना, पोलिसांना मारहाण करीत आहेत. अशांना कठोर शासन झाले पाहिजे. डॉक्टर्स, नर्सेस, पोलीस यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपण सर्व भारतीयांनी एक दिवस एकाच वेळी घरातले दिवे १० मिनिटे बंद करून तेला-

तुपाचे दिवे प्रज्वलित केले. मेणबत्त्या, टॉर्च लावले, टाळ्या वाजवल्या, भांड्यांचा नाद केला. अंधारातून प्रकाशाकडे जाणे हा आपल्या भारतीय संस्कृतीचा चैतन्यमंत्र आहे.

कोरोनामुळे हातावर पोट असणाऱ्यांचा रोजगार गेला. अशा गरजूंसह बेघरांना माजी पोलीस महासंचालक डी. शिवानंदन यांची 'रोटी बँक' मदतीला धावून आली. एकाचवेळी ३ हजार लोकांचे जेवण बनेस असे स्वयंपाकघर, १० व्हॅन तसेच १० चालक अशी त्यांची टीम अनेक वर्षे सामाजिक जाणीवेचे भान जपत आहे. गरजूंसाठी जेवणाची व्यवस्था ते करीत आहेत. मूळचे तामिळनाडूचे ते रहिवासी आहेत. जर्मनीत फूड बँक आहेत. त्याला जर्मन भाषेत 'ताफेल' म्हणतात, साऱ्या जर्मनीत मिळून सुमारे ९३० फूड बँक आहेत. समाजामध्ये चांगल्या विचारांचे, कृतीचे अभिसरण सातत्याने होणे गरजेचे आहे. अनेक चॅरिटेबल ट्रस्ट, धार्मिक ट्रस्ट, सामाजिक संस्था, फौंडेशन, दानशूर व्यक्ती असे अनेकजण कुणी उपाशी राहू नये या कळकळी पोटी अन्नदानाचे पवित्र कार्य सातत्याने दरदिवशी करीत आहेत. आर्थिक दुर्बलघटकांना संसारोपयोगी साहित्याचे कीट तसेच आर्थिक मदत दिली जात आहे. कोरोना काळात भूकबळी जाता कामा नये म्हणून अन्नछत्र उघडली जात आहेत. भुकेल्यापर्यंत अन्न पोहचवत आहेत. तरुणाईचा उल्लेखनीय पुढाकार कौतुकास्पद आहे. रुग्णालयात रक्ताचा तुटवडा जाणवू नये यासाठी तरुणांनी सामाजिक बांधिलकीतून रक्तदान मोहिम सुरु केली. रक्तात मानवता धर्म पाहिला. अभिमान वाटावा असे काम केले. दातृत्व भागवतयं गरजूंची भूक. दातृत्वाची धन्यता ज्या हातांना लाभते त्याला चंदनाचे हात असे म्हणतात. हे भाग्य आमच्या महासंघालापण लाभले. याचा अभिमान वाटतो.

कोरोना विषाणूमुळे पसरलेल्या 'कोव्हिड-१९' या संसर्गजन्य आजाराचा फैलाव सुरू झाल्यानंतर भारताने इतर देशांपेक्षा तातडीने हालचाली करून प्रतिबंधक उपाय योजना केल्या. अशा शब्दात ऑक्सफर्ड विद्यापीठाने आपल्या देशाचे कौतुक केले आहे. विद्यापीठाने या संदर्भात केलेल्या एका अभ्यासातून हा निष्कर्ष काढला आहे. अन्य कोरोनाग्रस्त देशांच्या तुलनेत भारताची ही कामगिरी उजवी असल्याचे निष्कर्षात म्हटले आहे. कोरोना साथीचा मुकाबला करण्यासाठी शेजारी देशांना मदतीचा हात देण्याच्या धोरणाचा भाग म्हणून भारताने १५ डॉक्टरांचे एक पथक कुवेतला पाठविले. भारताने बहारिनलाही हायड्रोक्सिक्लोरोक्वीन या औषधाचा पुरेसा साठा पाठविला. हेच औषध अमेरिकेलाही निर्यात केले. हायड्रोक्सिक्लोरोक्वीन औषध पाठविण्याची ओमनेपण भारताला विनंती केली आहे. नेपाळ, श्रीलंका यांनी पण भारताकडे वैद्यकीय मदत मागितली. आपण यथाशक्ती ती केलीही.

आपली भारतीय संस्कृती : ज्ञानेश्वरमाऊलींचे पसायदान म्हणजे विश्वात्मक देवाजवळ विश्वकल्याणासाठी केलेली विश्वव्यापी प्रार्थना आहे. विश्वकल्याणासाठी स्फुरलेली ती जगातील सर्वोत्तम प्रार्थना आहे. आपली भारतीय संस्कृती किती महान आहे हे सांगताना स्वामी विवेकानंद म्हणतात की, सर्व जगाला देऊन पुरेल शिवाय उरेल असा एक अनमोल ठेवा प्रत्येक भारतीयाकडे आहे, तो म्हणजे भारताची विशाल भारतीय संस्कृती. ती कशी आहे हे सांगताना स्वामीजी म्हणतात, ''जी सूर्यासारखी तेजस्वी आहे, चंद्रासारखी शीतल आहे, गंगेसारखी पवित्र आहे, सागरासारखी अथांग आहे आणि आकाशासारखी उत्तुंग आहे. 'जे जे उत्तम उदात्त सुंदर' या जगात जे उत्तम आहे, उदात्त आहे, सुंदर आहे, ते घेवून वाढणारी संस्कृती म्हणजे आपली भारतीय संस्कृती. चला तर कोरोनावर मात करून आपल्या या विशाल भारतीय संस्कृतीचे विराट दर्शन साऱ्या विश्वाला घडवू या !

**श्री. बाळासाहेब भाटे,** सातारा
९४२२४०२६४९



# आयुष्य

जाणं येणं वाढलं की
आपोआप प्रेम वाढेल,
गप्पांच्या मैफिलीत
दुःखाचा विसर पडेल ॥

महिन्यातून एखाद्या दिवशी
अंगत-पंगत केली पाहिजे,
पक्वान्नाची गरजच नाही
पिठलं-भाकरी खाल्ली पाहिजे ॥

ठेचा किंवा भुरका केल्यास
बघायचंच काम नाही,
मग बघा चार घास
जास्तीचे जातात का नाही ॥

सुख असो दुःख असो
एकमेकांकडे गेलं पाहिजे,
सगळ्यांच चांगलं होऊ दे
असं देवाला म्हटलं पाहिजे ॥

एखाद्या दिवशी सर्वांनी
सिनेमा पहावा मिळून,
रहात जावं सर्वांशी
नेहमी हसून खेळून ॥

काही काही सणांना
आवर्जून एकत्र यावं,
बैठकीत सतरंजीवर
गप्पा मारीत बसावं ॥

नवरा बायको दोन लेकरात
''दिवाळ सण'' असतो का ?
काहीही खायला दिलं तरी
माणूस मनातून हसतो का ?



साबण आणि सुगंधी तेलात
कधीच आनंद नसतो,
चार पाहणे आल्यावरच
आकाश कंदील हासतो

सुख वास्तूत कधीच नसतं
माणसांची ये-जा पाहिजे,
घराच्या उंबरठ्यालाही
पायांचा स्पर्श पाहिजे ॥

दोन दिवसासाठी का होईना
जरूर एकत्र यावं,
जुने दिवस आठवताना
पुन्हा लहान व्हावं ॥

वर्षातून एखादी दुसरी
आवर्जून ट्रिप काढावी,
''त्यांचं आमचं पटत नाही''
ही ओळ खोडावी ॥

आयुष्य खूप छोटं आहे
लवकर लवकर भेटून घ्या
काही धरा काही सोडा
सगळे वाद मिटवून घ्या ।
आयुष्य खूप छोटं आहे
लवकर लवकर भेटून घ्या

# कऱ्हाडपंथी



मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

कोकणात, देशावर अन्
आता तर
परदेशीही आमची बिऱ्हाडे
मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

अतिथी देवो भवः असा
आमचा शिरस्ता
पोटातून हृदयाकडे जातो म्हणे प्रेमाचा रस्ता
ओळखी इकडे तिकडे चोहीकडे
मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

भेटीसाठी ठरल्या की आधी भोजनाची चर्चा
खमंग स्वादिष्ट जेवणात आमचा नंबर वरचा !
आमच्यात पुरुषही झकास रांधे-वाढे,
मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

साधेपणा आणि नीटनेटकेपणा आमच्या अंगी
उधळपट्टी कमी, तरी बेत सारे जंगी
कलागुणांची आवड आमच्याकडे
मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

फार ढिसाळ कारभार नाही, ना कडक शिस्त
तरी चोख काम करण्यावर आमची भिस्त
ना अतिरेक काटकसरीचा, ना खर्चाचे राडे
मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

पक्वान्न नसली तरी चालतील,
आमटी आमची जीव की प्राण
शेजाऱ्यांशी चालू असते
पदार्थांची देवाण-घेवाण
सगळं असलं तरी डावीकडील
पदार्थांवर जीव जडे,
मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

शेकोटीच्या अती जवळ ना जातील,
तटका बसेल...
अती दूर ही न जातील, ऊब हुकेल
नातेसंबंधातही दे भान असे आमच्याकडे
मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

आलं गेलं सतत हवं तरच ते घर,
असा आमचा नियम
आज हे येणारेत उद्या त्यांच्याकडे जायचंय
चालू असतं कायम
कुणाकडे गेल्यावर मदतीला सरसावतो पुढे
मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

मावस बहिणीचा मामेदीर तो चुलत भावाच
मावसभाऊ

नात्यांची कोडी घालत,
सोडवत एकमेकांना धरून राहू
अर्धा वेळ बोलणं हेच, जेव्हा गप्पांचा अड्डा पडे...
मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

झाशीच्या राणीचे शौर्य झळाळे, किर्लोस्करांचे यंत्र
खडाडे, खांडेकरांची लेखणी झुळझुळे...
महान व्यक्तींची यादी संपतच नाही बापरे !
तसेच पुढती तळवलकर, करंबेळकर, टोपकर,
कशाळकर, आठल्ये आणि श्रीखंडे
मी आहे ब्राह्मण कऱ्हाडे !

**श्री. गोपाळ भाटवडेकर**, पुणे
९८२५०९७९७०६

# ऋणानुबंध... एका तपाचा...

आठवणींच्या आठवणी.. आठवती घडोघडी.. आठवणींना आठवणींची... वाहतो ही आठवणींची जुडी.

हे सगळं लिहिण्याचं प्रायोजन इतकंच ही आजही त्या बसलेल्या धक्क्यातून पुरते सावरलेलो नाहीय, पण जग रहाटी ही कुणा साठीही थांबत नसते आणि आपलं कितीही प्रिय माणूस आपल्याला मागे टाकून आपल्यातून निघून गेलेलं असलं तरी त्या जगरहाटीसोबतच आपल्यालाही धावत रहावं लागतं.

साधारणतः २००८ चा काळ असेल माझ्या आत्येबंधूमुळे माझी सर्वप्रथम ओळख स्व. संतोष देव बरोबर झाली. तसं संतोष हे व्यक्तिमत्त्व म्हणजे ठाण्यातील कऱ्हाड्यांमधलं दिलखुलास, मनमोकळं आणि बिनधास्तच. त्यावेळी मी मुंबई कऱ्हाडे ब्राह्मण संघाचा एक साधा कार्यकर्ता होतो तर संतोष ठाणे संघाचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक होता. त्याच सुमारास असेल कधी ने नीटसं आठवत नाही, पण ठाण्यातील नातेवाईकांकडे आवर्जून उपस्थित असायचो. अशाच एका कार्यक्रमात माझी आणि श्री. संजयदादाची ओळख संतोषने करून दिली. त्या पहिल्या भेटीचत संजयदादाने संतोषला मला ठाणे संघाचे सभासदत्व देण्यास सुचविले. सभासद झालो खरा, पण कधी ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाशी माझी नाळ जुळेल किंवा हृदय नातं जुळेल असं मात्र स्वप्नातही वाटलं नाही. अशातच माझं वरळीचं निवासस्थान काढून आम्ही ठाण्यात स्थलांतर करण्याचं निश्चित केलं आणि २०११ मध्ये कायमचाच ठाण्यात आलो.

ठाण्यात आलो तेव्हापासून मात्र काहीना काही कारणाने ठाण्यातील अनेक कऱ्हाड्यांशी संतोष मुळेच नुसत्या ओळखी झाल्या नाहीतर त्या दृढ झाल्या आणि वाढल्यासुद्धाय अशातच संतोष आणि मी जवळपास सतत काहीना काही कारणांनी भेटू लागलो. त्यातच संजयदादाशी सुद्धा भेटीगाठी वाढत गेल्या.

खरंतर पहिल्या भेटीतच संजयदादा म्हणजे एक वेगळंच रसायन असल्याचं लक्षात आलं. जेव्हा म्हणून भेटींची भट्टी जमू लागली तेव्हा स्वभावातील एक-एक पैलू दिसू लागले आणि एक भावनिक नातं जुळू लागलं.

अगदी सुरुवातीलाच आंबर्डेकर साहेब... मग संजय साहेब अशा हाका मारता मारता अचानकपणे तोंडून संजयदादा अशी हात माझ्या तोंडातून निघून गेली आणि तिही एकेरीत संबोधून.

मी लगेचच एकेरीत संबोधलं तेव्हा लगेचच चूक ध्यानी आम्ही म्हणून ताबडतोब माफी मागितली. पण मनाचा मोठेपणा आणि मोकळेपणा बघा, ''अरे संदीप, आज नात्यातले सोडून तू पहिलाच असशील की नातं नसताना ज्याने मला दादा म्हणून हाक मारली. तू मला एकेरीत दादा बोललास तर मला आवडेल.'' आणि तोच एक क्षण असा होता आमच्यातील एक अंतर्मनात असलेलं भावनिक नातं अधिक दृढ झालं. अर्थात या घटनेचा एकमेव साक्षीदार म्हणजे आमच्यातील महत्त्वाचा दुवा असलेला माझा मित्र स्व. श्री. संतोष देव होता. कारण मी आणि संतोष हे २०११ मध्येच एकेरी नावाने एकमेकांना हाक मारण्याइतके जवळ आलो होतो.

कालांतराने स्व. श्री. संतोष देव ने अचानकपणे एक्झिट घेतली. एक अत्यंत जवळचा मित्र गमावल्याचं दुःख झालंच, पण अजूनही त्याला विसरू शकलो नाही आणि विसरणारही नाही.

अंदाजे २०१५ किंवा १६ चा कालावधी असेल माझे आतेबंधू यांनी ठाणे संघ कार्यकारिणी सदस्यत्वाचा राजीनामा दिला तोच मुळी तत्कालीन कार्यवाह श्री. शेणोलीकर काकांना कार्यकारिणीसाठी माझे नांव सुचवून. त्यावेळी ठाणे संघाचे अध्यक्ष श्री. संजयदादा आंबर्डेकर होते. कार्यकारिणीत रीतसर प्रस्ताव पारित करून माझा समावेश ठाणे संघाच्या कार्यकारिणीत झाला. कार्यकारिणीत श्री. शेणोलीकर काका, श्री. संजयदादा, श्री. मंदार जोशी व श्री. सचिन ताटके वगळता अन्य कुणाशी माजी विशेष ओळख नव्हती. हळूहळू ओळखी झाल्या. त्या वाढल्या आणि आज दृढही झाल्या. पण याचं सर्वप्रथम श्रेय द्यायचं झालं तर त्याची सुरुवात ही मुंबई संघापासून करावी लागेल. त्या श्रेय नामावलीत मुंबईचं एकमेव व्यक्तिमत्त्व म्हणजे मुंबई संघाचे कार्याध्यक्ष आणि महासंघाचे अध्यक्ष श्री. विजयदादा आंबर्डेकर, श्री. शेणोलीकर काका, श्री. संजयदादा आंबर्डेकर अशा प्रभृतींमुळे मला एक वेगळ्या उंचीची ओळख मिळाली.

२०१८ च्या ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या निवडणुका जाहीर होऊन त्या कार्यकारिणीत सर्व सदस्यांचा बिनविरोध निवडणुका होऊन समावेश झाला. आता सर्वसंमतीने

पदाधिकरारी नियुक्त करण्याच्या नेमक्या क्षणी ठाणे संघाच्या कार्यवाह पदासाठी माझी निवड व्हावी हा प्रस्ताव संजयदादांच्याच शिफारशीने मांडण्यात आला आणि अन्य सदस्यांनी अनुमोदन दिलं.

मित्रहो, खरंतर कार्यवाह पद भूषवणं म्हणजे खायचं काम नाही. मनातून थोडा साशंकच होतो की पेलवेल की नाही म्हणून. खाजगीत मात्र संजयदादाला बोलूनही दाखवलं पण त्याने माजी अध्यक्ष आणि विद्यमान विश्वस्तांपैकी एक विश्वस्त म्हणून नाही तर थोरल्या भावाच्या अधिकारवाणीत सांगितलं आम्ही आहोत तुझ्या पाठिशी, तू हे पद सांभाळ, काही होत नाही.

ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघ कार्यात माझी एक जबाबदार पदाधिकारी या नान्याने वाटचाल सुरू झाली. वेळोवेळी अनुभवी व्यक्ती म्हणून सल्ले मिळत होते, साथ मिळत होती. महासंघ कार्यात मी देखील आपसूकच जोडला गेलो आणि महासंघाच्या कार्यात वेगवेगळ्या ठिकाणी अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष यांच्याबरोबर एकत्र फिरण्याच्या अनेक संध्या मिळाल्या. खूप काही शिकायला मिळालं.

अशातच एक दिवशी कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाने संपूर्ण जग ग्रासलं गेलं. त्यात आपला भारत देश देखील भरडला गेला आणि लॉकडाऊन होऊन सगळंच ठप्प झालं. मग काय अधूनमधून फोनवर किंवा व्हॉट्सअप वर बोलणं वाढलं पण संपर्क मात्र दोन्हीकडून व्हायचा.

अशातच जेव्हा लॉकडाऊन प्रक्रिया शिथिल झाली त्याच दरम्यान माझ्या मुलीने एक दिवस भोपळ्याचे घारगे केले होते व केवळ एका कौटुंबिक ग्रुपमध्ये चिडवण्यासाठी म्हणून त्या घारग्यांचे फोटो टाकले आणि स्व. श्री. संजयदादाने माझ्यासाठी घारगे ठेव अशी प्रेमळ आज्ञाच केली. दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता मी घारगे व दही असं घेऊन ऑफिसला पोहोचलो. मात्र अक्षरशः तुटून पडला आणि ते घारगे फस्त केले. तृप्त होऊन माझ्या मुलीला त्याने घारगे छान झाल्याची पावती दिलीच, सोबत आशीर्वाद देखील दिले. त्यादिवशी आम्ही दोघेही वेगवेगळ्या विषयांवर जवळपास अडीच तास गप्पा मारत बसलो होतो. निरोप घेतला आणि घरी आलो.

नियतीच्या मनात काही वेगळंच होतं. तीच आमची शेवटची भेट ठरली. कारण त्यानंतर केवळ पाचव्या दिवशी सकाळीच बातमी मिळाली की संजयदादा हा ब्रेन हॅमरेजने सिरीयस झाला असून त्याला बेथनी हॉस्पिटलमध्ये दाखल केले गेले आहे. बातमी अशी काही कानात तेलासारखी शिरली की नखशिखांत हादरलो... पायाखालची जमीन सरकली. काही मिनिटं स्तब्ध झालो, सावरणं कठीण होऊन बसलं. आपसूक डोळे भरून आले. देवाला नकळतच हात जोडले गेले, प्रार्थना केली, ''देवा.. परमेश्वरा.. या आजातशत्रू असलेल्या, अगणित मित्र संपदा असलेल्या संजयदादाला या विळख्यातून बाहेर आण. भले सहा महिने, वर्षभर त्याला जाग्यावर बसवून ठेव, पण याला पुन्हा पहिल्यासारखं स्वच्छंदी आयुष्य बहाल कर. अशा सारख्या माणसांची आज आम्हां आप्तांना, मित्रांना गरज आहेच पण मदतीची हाक मारणाऱ्यांना याच्यासारख्या मदतीच्या हातांची गरज आहे. पण परमेश्वराच्या मनात, नियतीच्या मनात काही वेगळचं होतं.

गुरुवार, ९ जुलै, २०२० रोजी दुपारी २ च्या दरम्यान जी बातमी येऊच नये असं वाटत होतं तीच बातमी येऊन थडकली. आम्हां ठाणेकर कऱ्हाड्यांचे लाडके माजी अध्यक्ष व विद्यमान विश्वस्त श्री. संजयदादा आंबर्डेकर यांना देवाज्ञा झाली आणि ते अनंतात विलीन झाले.

ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघ त्यांच्या प्रसन्न, सतत आनंदी चेहऱ्याला कायमचा मुकला.. एकाकी पडला.

स्व. श्री. संजय आंबर्डेकर यांना समस्य ठाणेकर कऱ्हाडे ज्ञाती बंधू-भगिनींतर्फे आणि कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

शेवटी आपसूकच एक श्लोक आठवला तो इथे उद्‌धृत करतो,

*''नैनं छिंदंती शस्त्राणी...*
*नैनं दहती पावकः...*
*नः चैनं क्लेद यंत्यापो...*
*नः शोषयती मारुतः...''*

**संदीप कळके**
कार्यवाह, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ठाणे

# आदरांजली

## ‘संजय आंबर्डेकर’ मनाला हुरहूर लावणारे एक व्यक्तिमत्त्व

*जिंदगी एक सफर है सुहाना !*
*यह कल क्या हो, किसने जाना !*

जीवनाबाबत अगदी खरं भाष्य असलेल्या ओळी. आपल्या जीवनप्रवाहात अनेक व्यक्ती येत असतात, पण त्यातल्या काही व्यक्ती, त्यांच्या आठवणींनी आपल्या मनावर अस्तित्त्वाच्या खुणा कायमच्या कोरून जातात. मला भेटलेलं त्यातले असं एक व्यक्तिमत्त्व म्हणजे संजय आंबर्डेकर.



संजय सी.ए. होता. त्याचा स्वतःचा व्यवसाय होता. संजय उच्चशिक्षित, अनेक उच्चपदावर काम करणारा. कसा असेल याचा स्वभाव? इगो जपणारा तर नसेल ना? असे एक नाही अनेक प्रश्न त्याला न भेटलेल्या व त्याला न ओळखणाऱ्यांच्या मनात कदाचित येतील. पण संजय म्हणजे सर्वांवरच प्रेम करणारे, सर्वांनीच आदर्श स्थानी मानावे असे व्यक्तिमत्त्व होते.

संजयची आणि माझी ओळख तशी गेल्या १५ वर्षातली. आंबर्डेकर जरी आडनाव असले तरी नाते नसलेला आणि तरीही त्यापेक्षाही जवळचे संबंध निर्माण झालेला आमच्या सर्वच कुटुंबाचा (कोकणापासूनच्या) गिरगावातील मित्र.

महासंघ कार्य किंवा सहलीच्या निमित्ताने कुठे एकत्र फिरायला गेल्यावर हिला नेहमीच विचारलं जायचं, संजय तुमचा धाकटा दीर का हो ? आणि ही सुद्धा आनंदाने सर्वांना हो म्हणून सांगायची.

संजयही हिची ओळख वहिनी म्हणूनच करून द्यायचा.

गेली अनेक वर्षे संजय ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे कार्य करीत होता आणि मी मुंबईच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे. एकमेकांच्या कार्यक्रमात सहभागी होणे, लागेल ती मदत करणे, भेटणे आणि फोन यातून आमची मैत्री खुलत गेली. आणि ती अधिक घट्ट झाली.

संजय म्हणजे अजातशत्रू, हसतमुख, मनमिळाऊ, ओळख होताक्षणीच त्या कुटुंबाचा सदस्य होऊन जाणारा. गर्व नाही, अपेक्षा नाही की कुठल्याही गोष्टीचा इगो नाही. पटकन सर्वांशी जुनी ओळख असल्यासारखा मिसळून जायचा.

संजयच्या जीवनाची काही खास वैशिष्ट्ये मला आढळली.

तो गाण्यावर, खाण्यावर आणि फिरण्यावर मनस्वी प्रेम करणारा होता. सर्वांशी मैत्री करायला त्याला आवडायचे. याबाबतीतील त्याचे अनेक किस्से त्याचे मित्र आजही त्याच्या आठवणींच्या मैफिलीत सांगतात.

एकदा गिरगावात आमच्याकडे कोकणातून ३ बरके म्हणजे रसाळ गरे असलेले फणस आले होते. संजयला बरके म्हणजे रसाळ गरे खूप आवडायचे. त्याला हे कळल्यावर त्यांनी फोन करून मला फणस पिकल्यावर कळवा असे आग्रहाने सांगितले.

फणस पिकल्यावर गरे आणि हिने खास त्याच्यासाठी बनविलेल्या सांजणांवर त्याने ठाण्यावरून येऊन मारलेला ताव आम्हाला आजही समाधान देऊन जातो.

मनापासून संजयला खाताना बघून देणाऱ्यालाही आनंद आणि समाधान होत असतं. याचा आनंद संजयच्या अनेक मित्रांनी निश्चितच मिळविला आहे.

त्याचे म्हणणे असायचे, ‘चवीने खाईल, त्याला देव भरभरून देईल.’ आणि त्याच्या बाबतीत हे १०० टक्के खरं होतं.

एका कामानिमित्त मी, संजय आणि संदीप कळके पुण्याला गेलो होतो. काम झाल्यावर गुर्जरांना, आता जेवायला कुठे जायचे म्हणून विचारून साताऱ्यापर्यंत खर्डा-भाकरी खायला घेऊन जाणारा हा अवलिया होता.

सावंतवाडीची महासंघाची मिटींग आणि त्यानंतरची कोकणची मुशाफिरी, येताना चिपळूणला थांबून लवंग आमटी आणि पुरणपोळीचा खास बेत मामाला करायला लावणारा हा खरा खाद्य प्रेमी होता.

हुबळीच्या मिटिंगनंतर तेथील प्रसिद्ध 'गिरमीट भेळी' साठी २५ किलोमीटर फिरणारा फक्त संजय असू शकतो. याची मला खात्री आहे.

खाण्यावर मनसोक्त प्रेम करणारा म्हणून संजयची एक खास ओळख होती. जेवढे खाण्यावर तेवढचे त्याचे प्रेम गाण्यावरही होते.

अनेक हिंदी-मराठी गाणी त्याची तोंडपाठ होती. गाणी म्हणायलाही तो नेहमी पुढे असे.

पावसाळी सहली, कोकण देवदर्शन सहल, त्यातील कोरावकेवर जागवलेली रात्र, ३१ डिसेंबरच्या दोन्ही वर्षांच्या त्याच्या गायनाने जागवलेल्या रात्री, ठाण्यातील कुमार माईणकरांच्या घरातील गीतसंध्या अशा एक नाही अनेक प्रसंगाच्या आठवणींनी आज डोळ्याच्या पापण्या ओलावतात.

फिरण्यावरही त्याचे तेवढेच प्रेम होते. कुठेही जायला त्याची तयारी असायची. संजय, मी आणि आर. के. कुटुंब, दीपक पराडकर आणि विजयराव फळणीकर आम्ही महासंघाच्या मिटिंगनिमित्त नागपूरला आलो होतो. त्या निमित्ताने नागपूर परिसर फिरुया असा संजयचा आग्रह होता. नागपूरसंघाचे अध्यक्ष श्री. पराडकर साहेबांनी आमची व्यवस्था केली होती.

ताडोबा सफरीत व्याघ्रदर्शन झाल्यावर त्याच्या चेहऱ्यावरील सहल यशस्वीतेचा आनंद आजही आठवतो. आपल्याला वाघोबांचे दर्शन होणारच अशी त्याची खात्री होती.

'आंबर्डेकर है तो सब मुमकिन है' असे तो मिश्किलीने म्हणत असे. आणि ते त्याने खरे करून दाखवले.

वर्धा आश्रम भेट आणि आनंदवन व हेमलकसाला प्रकाशभाऊ आमटेंच्या भेटीलाही तो उत्साहाने सहभागी झाला होता. प्रकाशभाऊ आणि त्यांच्या मुलाबरोबर आश्रमाबाबत झालेल्या चर्चेतील त्याच्या उत्साही सहभागाच्या आठवणी आज या निमित्ताने जाग्या झाल्या आहेत.

ज्ञातीवर तर त्याचे प्रेम होतेच पण समाजातील इतर वर्गावरही त्याचे तितकेच प्रेम होते. BNI, कऱ्हाडे बिझिनेस फोरम, ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघ, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ अशा अनेक संस्थांवर उच्चपदस्थ म्हणून तो अनेक वर्षे कार्यरत होता. सर्वच संस्थांना तो लागेल ती मदत करीत असे. महासंघाच्या नागपूर सभेतील त्याचे समारोपाचे भाषण त्याच्या दयाळू स्वभावाचे प्रतीक होते.

आज संजय आपल्यात नाही यावर अजून माझा विश्वास बसत नाही.

त्याच्या अचानक जाण्याने महासंघ व कऱ्हाडे ज्ञातीची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. आज एवढेच म्हणावसं वाटतं...

''जो आवडे सर्वांना, तोचि आवडे देवाला''

संजयच्या बाबतीत, आज गाण्याच्या या ओळी सर्वार्थाने खऱ्या झाल्या असल्याची जाणीव होते आहे.

मित्रा, संजय आज जेथे तू असशील तेथे तू सर्वांनाच प्रिय असशील याची आम्हाला खात्री आहे. तुझे पुढील जीवन शांत, सुखी व आनंदी राहो. तुझ्या पुढील देवप्रवासाला आमच्या लाख लाख शुभेच्छा.

तुझा मित्र-साथी-सहकारी

**विजय आंबर्डेकर**

# तपस्वी गायक : चिंतामणी भागवत

कशेळी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील तपस्वी गायक चिंतामणी भागवत ऊर्फ बंडुभाऊ भागवत यांचे त्यांच्या ८२ व्या वर्षी कशेळी येथे त्यांच्या राहत्या घरी दुःखद निधन झाले.

लेंगा, पांढरा सदरा आणि डोक्याला तपकिरी रंगाची टोपी असा त्यांचा साधासुधा वेष ! त्यांच्या बालपणीच त्यांच्या मातोश्रींचे निधन झाले. त्यांचे वडील पं. सखारामपंत भागवत हे जुन्या काळातील एक नामवंत तबलावादक होते. त्यांनी मास्टर कृष्णराव तसेच विख्यात गायिका हिराबाई बडोदेकर अशासारख्या अनेक गायकांना तबलासंगत केली होती. वडिलांचा हा वारसा बंडुभाऊ यांच्याकडे चालून आला. मात्र वडिलांजवळ त्यांना तबला शिकता आला नाही. परंतु तबला वादनाची ओढ असल्याने त्यांनी स्वप्रयत्नाने तबलावादन कला अवगत केली. बैठतीचे गाणे विशेषतः भजन, कीर्तन, नाटक इ. कार्यक्रमांना ते उत्तम साथ करीत. मात्र गायन हे त्यांचे आवडीचे क्षेत्र होते.

गायनकलेत त्यांनी स्वतःचा असा एक ठसा उमटवला. सूर, ताल, लय हे त्यांचे अंगभूत गुण होते. कोणत्याही गुरुकडे ते गाणे शिकले नाहीत. शास्त्रीय आणि भक्तीसंगीताच्या अनेक मैफिली त्यांनी ऐकल्या. आकाशवाणीवरून प्रसारीत होणाऱ्या शास्त्रीय, उप-शास्त्रीय, भक्तीसंगीत, भावसंगीत यांचे अनेक कार्यक्रम त्यांनी डोळसपणे श्रवण केले आणि एखाद्या साधकाप्रमाणे रियाज करून त्यांनी स्वतःचे रागदारीला प्राधान्य असलेले गाणे तयार केले.

संगीताची अविरत उपासना करण्यासाठी ते अविवाहित राहिले. गाण्यावर त्यांनी शेवटपर्यंत प्रेम केले, सतत चिंतन केले. प्रचंड मेहनतीने संगीतकलेत एका विशिष्ट उंचीपर्यंत जाऊन पोहोचले.

बंडुभाऊ गाण्याच्या मैफिली करीत आणि चक्रीभजनातही गात असत. अभंग गाताना होर्मोनियमच्या तिसऱ्या सप्तकात प्रवेश करून आलाप, ताना घेऊन ते लीलया खर्जात येत असत. अनेक रागांचे आरोह, अवरोह, नोटेशन त्यांना ज्ञात होते. अभंगात एका चरणातून दुसऱ्या चरणात जाताना ते पहिल्या रागातून दुसऱ्या रागात सहज प्रवेश करीत कधी-कधी ते एकाद्या गीतमध्ये तीन-चार रागांचेही मिश्रण करायचे. शेवटी मूळ रागात सहजगत्या यायचे. रागदारी मिश्रणकला ही त्यांची खास खासियत होती. अभंग गायनात ते तादात्म्य पावत. त्यांच्या सुमधुर आणि स्वर्गीय अशा गाण्याचा श्रोत्यांना एक अवर्णनीय आनंद मिळायचा. 'पोटापुरते देई मागणे' या त्यांच्या आर्त भैरवी गायनाने श्रोत्यांच्या डोळ्यातून अश्रू येत.

बंडुभाऊंचे वयाच्या ३६-३७ वर्षांपर्यंतचे वास्तव्य मुंबईला होते. दिवसा पोटापुरती नोकरी करून दर गुरुवारी बोराबाजार (व्ही.टी.) येथील भजन कार्यक्रमात ते सहभागी होत. मुंबई, कर्जत येथे त्यांचे अनेक भक्तीसंगीताचे कार्यक्रम झाले. ठाणे येथे दरवर्षी रामनवमी उत्सवात त्यांना मैफिलीसाठी बोलावणे येई, तसेच ठाणे येथील टिपणीस कुटुंबात प्रतिवर्षी गणेश चतुर्थीला त्यांचा कार्यक्रम होत असे. त्यावेळी सुप्रसिद्ध गायक पं. राम मराठे हे शेवटपर्यंत थांबून त्यांचे सुश्राव्य भक्तीसंगीत ऐकत. पं. सी. आर. व्यास (मुंबई) यांनी आपल्या निवासस्थानी बंडुभाऊंची मैफिल आयोजित केली होती. मुंबई आकाशवाणीवरून त्यांचा भक्तीसंगीत, सुगम संगीत कार्यक्रम प्रसारीत झाला. मुंबईच्या वास्तव्यात त्यांचे मित्र संगीत रसिक माधव नाटकर यांनी त्यांना सर्व प्रकारचे साहाय्य केले. चित्रपटात, टीव्हीत, मालिकेत गजानन महाराजांची भूमिका करणारे वसंतराव गोगटे हे ही त्यांचे मित्र होते. १९९७ मध्ये बंडुभाऊंचे गुरूबंधू आणि मुंबई येथील प्रसिद्ध तबला गुरु पं. श्रीधर पाध्ये यांच्या जाहीर षष्टाब्दी कार्यक्रमात सुरुवातीला गायन सादर करण्याचा पहिला मान बंडुभाऊंना मिळाला. त्यावेळी 'गुरुमहती'वरील अभंगांचे समयोचित सादरीकरण करून त्यांनी अनेकांची वाहवा मिळवली.

वयाच्या ३८ व्या वर्षी ते मुंबई सोडून आपल्या कशेळी गावात आले. अखेरपर्यंत त्यांचे वास्तव्य कशेळीलाच होते. गावातील 'कनकादित्य' हे त्यांचे आवडते दैवत. या मंदिरातील दर रविवारचे भजन कधीच चुकले नाही. शिवाय 'लक्ष्मी-नारायण मंदिरातील शनिवारच्या भजनात ते सहभागी होत. ५ कि.मी. कालिकावाडी येथे चालत जाऊन ते एकादशीला होणाऱ्या भजनाला शंकरेश्वर मंदिरात उपस्थित राहात. शेकडोंच्या संख्येने त्यांचे अभंग, गौळणी, पाठांतर होते. पहाटेच्या वेळी मंदिरात होणारी काकडाआरती, प्रदक्षिणा गीते, इतर देवतांची गीते इ. सर्व गीते त्यांना मुखोद्गत होती. कार्यक्रमाच्या वेळी त्यांचा शिस्तीवर कटाक्ष असायचा. स्पष्टवक्तेपणा हा त्यांचा आणखी एक विशेष गुण होता.

ऐन तारुण्यात बंडुभाऊंना अंधत्व आले. तरीही त्याच उत्साहाने महाराष्ट्रात विविध ठिकाणी त्यांची गानसेवा सुरुच राहिली. आकाशवाणी रत्नागिरी केंद्रावर त्यांचे अनेक कार्यक्रम झाले. रत्नागिरी येथील 'खल्वायन' संस्थेने पहिल्या गायन कार्यक्रमाचा मान त्यांना दिला.

बंडुभाऊंनी स्वतः ७० पेक्षा जास्त रचना केल्या. त्यातील काही परिसरातील देवदेवतांवर आहेत. या रचना अवीट व अर्थपूर्ण आहेत. खेडेगावात एखाद्यावेळी तबलजी उपस्थित नसायचा. त्यावेळी ते स्वतः तबला वाजवून अगदी नेहमीच्या मोकळेपणाने गाणे सादर करीत. त्यांनी आपले शिष्य आनंद ओळकर यांना ७ वर्षे तबल्याची तालीम दिली. त्यासाठी कोणताही मोबदला स्वीकारला नाही. कार्यक्रमासाठीची बिदागी त्यांनी कोणालाही कधीच सांगितली नाही. मिळेल ते मानधन समाधानाने स्वीकारले. प्रसिद्धीपासून ते दूर राहिले. 'नको आरती ही, नको पुष्पमाला' अशी त्यांची वृत्ती होती. या वर्षी कशेळी येथील रथसप्तमी उत्सवात त्यांची गाण्याची मैफिल होती. 'मागणे आणिक नाही देवा । नित्य घडावी भजन सेवा' या हंसध्वनी रागातील भजनपंक्ती आळवून ते अतिशय भावूक झाले आणि आपले शिष्य ओळकर यांना ते म्हणाले, ''हे माझे शेवटचेच गाणे आहे'' कारण त्यांना मृत्यूची चाहूल लागली होती. त्यांचे शब्द खरे ठरले आणि ८ दिवसातच हा सुरांचा चंद्र पृथ्वीवरील जीवन गाणे संपवून स्वर्गातल्या मैफिलीसाठी १३ फेब्रुवारी रोजी निघून गेला.

बंडुभाऊ भागवत म्हणजे एक ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व! समधुर व शब्दप्रधान गायकी जपणारा, श्रोत्यांच्या हृदयापर्यंत गाणे पोहचवणारा, ईश्वरावर अपरंपार श्रद्धा असणारा असा गायक पुन्हा होणे कठीणच आहे. त्यांच्या जाण्याने अनेक संगीतप्रेमी हळहळले. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली !

**श्रीकांत यशवंत पाध्ये**, आडिवरे

९४०५३२६१७१

## ❋ भावपूर्ण श्रद्धांजली ❋

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे कोषाध्यक्ष आणि ठाणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे विश्वस्त श्री. संजय रामचंद्र आंबर्डेकर यांचे दि. ९ जुलै २०२० रोजी दुपारी २ च्या दरम्यान अल्पशा आजाराने अकाली निधन झाले. आम्ही महासंघाच्या सर्व विश्वस्तांनी आपला एक सच्चा मित्र गमावला. खवय्या व गवय्या आणि सदाहसतमुख असा आम्हा सर्वांचा एक सहकारी विश्वस्त अनंतात विलीन झाला.

कै. संजय आंबर्डेकर यांना महासंघाच्या वतीने आणि अन्य संघप्रतिनिधींच्या वतीने दि. ६ सप्टेंबर २०२० रोजी गुगलमीटच्या माध्यमातून सभेचे आयोजन केले होते. या सभेमध्ये विविध संघाचे ३२ प्रतिनिधी उपस्थित होते आणि उपस्थित प्रतिनिधींनी आपले व्यक्तीगत अनुभव सांगत कै. संजय यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या सन २०१९-२०२० मधील नागपूर येथील दुसऱ्या सभेचा वृत्तांत

कऱ्हाडे ब्राह्मण संघ नागपूर यांनी कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या सन २०१९-२०२० मधील दुसऱ्या सभेचे आयोजन हॉटेल स्टेटस्, सिमाबर्डी नागपूर येथे दि. १६-२-२०२०. रविवारी केले होते. या सभेमध्ये नाशिक, अमरावती, मुलुंड, कोल्हापूर, डोंबिवली, सातारा, महासंघाचे सर्व विश्वस्त आणि यजमान नागपूर संघाचे सर्व कार्यकारी मंडळ उपस्थित होते. विविध शहरामधून येणाऱ्या संघ प्रतिनिधींची राहण्याची व्यवस्था दि. १५-२-२०२० पासून याच हॉटेलमध्ये केली होती. यावेळी महासंघाच्या या सभेस विश्वस्तांच्या पत्नीसुद्धा उपस्थित होत्या आणि विशेष अतिथी म्हणून दिपक पराडकर, मुंबई, श्री. राजेंद्र करंबळेकर आणि सौ. माधुरी करंबेळकर, ठाणे हेही उपस्थित होते. रविवार दि. १६-२-२०२० रोजी सकाळी सर्व प्रतिनिधी सकाळीच नाश्ता आणि चहा घेऊन सभास्थानी स्थानापन्न झाले आणि त्यानंतर दीपप्रज्वलन. सरस्वती आणि झाशीची राणी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. नागपूर संघाचे कार्यवाह यांनी सर्व उपस्थितींचे स्वागत केले आणि 'जर उपस्थित प्रतिनिधींना कोणत्याही प्रकारची मदत, सहकार्य हवे असेल तर त्यांनी निःसंकोचपणे कळवावे' असे आवाहन केले. महासंघाच्या या सभेस नागपूर संघाच्यावतीने शुभेच्छा देऊन सभेची सूत्रे महासंघाचे सचिव श्री. गणेश गुर्जर यांच्याकडे सुपूर्द केली.

सचिव श्री. गणेश गुर्जर यांनी अध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर यांना सभा सुरु करण्याची परवानगी मागितली आणि ती मिळाल्यावर रितसर सभेचे कामकाज सुरु केले. नेहमीच्या पद्धतीनुसार सर्वप्रथम दिवंगत सभासदांना दोन मिनीटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सर्व उपस्थितांना प्रथम आपला परिचय थोडक्यात करून देण्याबाबत सचिवांनी विनंती केली. सर्व सभासदांनी त्यास उत्तम प्रतिसाद आपला परिचय करून दिला. सचिव श्री. गणेश गुर्जर यांनी महासंघाचे नवीन सदस्य संघ अमरावतीचे श्री. श्रीरंग हिर्लेकर आणि श्री. राजेंद्र टेंबे यांचे सहर्ष स्वागत केले तसेच या सभेस आलेल्या महिलांचेही सहर्ष स्वागत केले.

यानंतर सभेचे विषय सूचीनुसार कामकाज सुरु झाले. सन २०१९-२०२० ची पहिली सभा हुबळीच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाने आयोजित केली होती. त्याचे इतिवृत्त सचिव श्री. गणेश गुर्जर यांनी वाचून दाखवले आणि त्यावर चर्चा झाली. सर्वानुमते इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.

महासंघाचे कोषाध्यक्ष श्री. संजय अंबर्डेकर यांनी एप्रिल २०१९ ते डिसें. २०१९ अखेरचा जमा-खर्च सभेपुढे सादर केला आणि त्यावर चर्चा झाली. या चर्चेमध्ये सर्वश्री भालचंद्र करंबेळकर, श्री. प्रमोद माईणकर, श्री. लघाटे, श्री. पावनगडकर, श्री. अनिल काटदरे, श्री. आनंद पराडकर, श्री. श्रीरंग माईणकर, श्री. विनायक जांऊेकर यांनी भाग घेतला आणि त्यानंतर मा. अध्यक्षांनी सदर जमाखर्चास मंजुरी देण्याबाबत विचारणा केल्यावर सर्वानुमते जमाखर्चास मंजुरी देण्यात आली. पुढील विषय होता तो महासंघाचे सन २०२०-२०२१ चे अंदाज पत्रकास मंजुरी देण्याबाबतचा होता. हा विषय श्री. गणेश गुर्जर सचिवांनी सभापटलावर सादर केला. याबाबत सर्व संघप्रतिनिधींना अगोदरच सभेची कागदपत्रे पाठविली असल्याने त्यावर उपस्थितांनी आपली मते मांडावी अशी सूचना केली. त्यावर उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे सचिवांनी दिली आणि सदर अंदाजपत्रकास मंजुरी द्यावी असे सुचविले. मा. अध्यक्षांनी सदर अंदाजपत्रक सर्वांनुमते मंजुर झाले असल्याचे जाहीर केले.

विषयसूची मधील महत्त्वाचा विषय यानंतर चर्चेस घेण्यास आला. 'संपर्क'ची सद्यस्थिती आणि ती

सुधारण्याबाबत सूचना करून त्यावर अंमलबजावणी करणे या विषयाबाबत सर्व संघ प्रतिनिधींनी विविध सूचना केल्या. अंक हा ऑनलाईन करून तो सदस्यांना पाठवावा वगैरे मुद्दे चर्चिले गेले. यावर सचिव यांनी संपर्कच्या सद्यस्थितीवर समर्पक निवेदन केले आणि प्रत्येक संघाकडून 'संपर्क'च्या वाटचालीत महत्त्वपूर्ण सहभागाची अपेक्षा व्यक्त केली.

दुसऱ्या सत्रामध्ये महासंघाच्या नवीन प्रथेनुसार ज्या संघाने कार्यक्रम आयोजित केला जातो त्या शहरातील प्रतिथयश कऱ्हाडे व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे दरम्यान महासंघाच्या पूर्व भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष आणि नागपूर संघाचे अध्यक्ष श्री. आनंद पराडकर यांनी आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केली म्हणून पुणेरी पगडी, शेला आणि सन्मानपत्र देऊन सन्मान केला. यावेळी सौ. पराडकर यांचाही साडी देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी प्रा. अरविंद खांडेकर यांचा सन्मान करणार होतो परंतु त्यांची प्रकृती अस्वस्थेमुळे सभेत सन्मान न करता त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, पुष्पगुच्छ असे सन्मानाचे स्वरुप होते. याचबरोबर नागपूरमधील प्रतिष्ठित कऱ्हाडे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यांची नावे पुढीलप्रमाणे...

१) श्री. विनायक पेंढारकर २) श्री. वसंत खेर ३) श्री. भालचंद्र पाध्ये ४) सौ. प्रभाताई देऊस्कर ५) सौ. जयश्रीताई पेंढारकर ६) श्री. देवेश पेंढरकर ७) श्री. निखिल मुंडले ८) श्री. गजानन सरदेसाई ९) श्री. दीवाकर टोळे १०) श्री. अरुण पळसुले ११) डॉ. मधुकर बोरवणकर १२) श्री. दिवाकर ढवळे

नागपूर संघातर्फे महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला. या हृद्य कार्यक्रमानंतर सत्कारार्थींच्या वतीने दोन मान्यवरांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. महासंघाचे अध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचा आढावा घेत आपले विचार उपस्थितांपुढे मांडले. श्री. संजय आंबर्डेकर महासंघाचे कोषाध्यक्ष यांनी आपल्या छोटेखानी पण भावपूर्ण निवेदनात नागपूरकरांनी केलेल्या आदरातिथ्याचा उल्लेख केला.

या सभेच्या अंतिम टप्प्यात सचिव श्री. गणेश गुर्जर यांनी आभार प्रदर्शनाचे भाषण केले. त्यांनी उपस्थित सर्वांचे अभिनंदन व आभार प्रकट केले. नागपूरच्या संघाने सभेस उपस्थित असलेल्या सभासदांचे आल्यापासून सभेचे कार्य पूर्ण होईपर्यंत नागपूरकरांनी ठेवलेल्या उत्तम व्यवस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सत्कारार्थींनी वेळात वेळ काढून आजच्या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. हॉटेल व्यवस्थापन, केटरिंग व्यवस्थापन, समारंभाचे सर्व सत्कार साहित्य निर्मिती करणारे श्री. ढवळे आणि मंडप व्यवस्थापक, फोटोग्राफर, पत्रकार या सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून हा कार्यक्रम आणि सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**गणेश गुर्जर**

सचिव, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

**'संपर्क' बाबतचे महत्त्वाचे निवेदन**

कोरोनाच्या संसर्गामुळे संपूर्ण भारतामध्ये लॉकडाऊन लागू झाला आणि सर्व व्यवहार थंडावले. महासंघाच्या माध्यमातून 'संपर्क' या त्रैमासिकाचे एप्रिल, जुलै, ऑक्टोबर आणि जानेवारी असे आर्थिक वर्षानुसार प्रकाशन होत असते. पण लॉकडाऊनमुळे जाने. २०२० चा अंक प्रकाशिक झाल्यानंतर एप्रिल व जुलै २०२० या अंकाचे प्रकाशन होऊ शकले नाही. त्यामुळे सभासदांकडून याबाबत विचारणा झाली की, 'या अप्रकाशित अंकाच्या वर्गणीबाबत काय निर्णय घेतला का ?' याबाबत महासंघाच्या कोअर कमिटीमध्ये दि. १६ ऑक्टोबर २०२० रोजी व्हॉट्सअपच्या माध्यमातून विषय मांडण्यात आला आणि असा निर्णय घेण्यात आला की, 'ज्या सभासदांची वर्गणी जमा आहे त्या सर्व सभासदांचा कालावधी २ त्रैमिासिकांसाठी वाढवण्यात यावा. सर्व संपर्क सभासदांना सूचीत करण्यात येते की या निर्णयानुसार ज्या-ज्या सभासदांची वर्गणी जमा आहे त्यांना एप्रिल आणि जुलै २०२० च्या अंकासाठीचा कालावधी वाढवण्यात आला आहे.

# पुणे संघ
# कोरोना डोनेशन वृत्तांत

मार्च महिना सुरु झाला आणि कोरोनाची सगळीकडे चर्चा सुरु झाली. बघता बघता लॉकडाऊन सुरु झालं. सगळे व्यवहार ठप्प झाले आणि या कोरोनाच्या लढाईत लोकांचे संरक्षण करण्यासाठी डॉक्टर्स, पोलिस, नर्स, स्वच्छता कर्मचारी, सरकार सगळे कंबर कसून कामाला लागले. पण परिस्थिती बिकट होत होती आणि सरकारी यंत्रणा ह्यांच्यावर आर्थिक पाठबळ कमी पडत होते. त्यामुळे अनेक संस्था सरकारच्या बरोबरीने मदतीला उभ्या राहिल्या. यात पुण्याच्या कऱ्हाडे ब्राह्मण संघाने सामाजिक बांधिलकी जपत मदत केली. म्हणून सर्व विश्वस्तांनी या कठीण काळात ऑनलाईन मिटिंग घेऊन मदत करण्याचे ठरवले. यावेळी लोकसहभागातून निधी उभा करण्याचा निर्णय एकमुखाने घेण्यात आला. या लोकसहभागातून देशविदेशातून जवळजवळ रु. ४,५०,०००/- पेक्षा अधिक निधी जमा झाला.

**या सर्व साहित्याचे पुढीलप्रमाणे वाटप केले गेले.**

**महापौर मा. मुरलीधर मोहोळ** यांच्याकडे **नायडू हॉस्पिटल**साठी मोठी मदत करण्यात आली. यामध्ये **पीपीई किट्स -१००, डॉक्टरांसाठी एन ९५ मास्क १००, अर्सेनिक अल्बम ३० या होमिओपथी गोळ्यांच्या बाटल्या १००, सॅनिटायझर बाटल्या १००** अशी मदत देण्यात आली. याची महापौरांनी त्यांच्या फेसबुक पेजवरून योग्य ती दखलही घेतली. त्यावेळी महापौरांसोबत उपमहापौर मा. सरस्वती शेंडगे, सभागृह नेते मा. धीरज घाटे, महापालिका आयुक्त मा. शेखर गायकवाड तसेच आरोग्य अधिकारी देखील उपस्थित होते.

पुण्यातील महत्त्वाच्या **पोलिस** आणि **ट्रॅफिक चौक्यां**मध्ये जसे कोथरूड, स्वारगेट, दत्तवाडी, अलंकार, वडगांव, सहकारनगर, सिंहगड रोड, धायरी, फरासखाना, नारायण पेठ, वानवडी, चतुःश्रृंगी, डेक्कन जिमखाना इ. यांना सॅनिटायझर स्टँड, तीन पदरी मास्क, अर्सेनिक अल्बम ३० होमिओपथी गोळ्यांच्या बाटल्या, सॅनिटायझरच्या बाटल्या, झेरॉक्स पेपर रिम यांची मदत केली. वाहतूक पोलिसांना तीन पदरी मास्क, होमिओपथी गोळ्या, सॅनिटायझर बाटल्या यांचे वाटप केले. यासोबतच ससून येथे कामास असणाऱ्या घोरपडी पेठ पोलिस चौकीतील पोलिस कर्मचाऱ्यांना त्यांच्या सुरक्षेसाठी १० पीपीई किट दिले गेले.

**वैकुंठ स्मशानभूमी**तील सर्व ३० कर्मचाऱ्यांना तीन पदरी मास्क, अर्सेनिक अल्बम ३० होमिओपथी गोळ्यांच्या बाटल्या, सॅनिटायझर बाटल्या, सॅनिटायझर स्टँड यांच्या स्वरुपात मदत केली. तीन पदरी मास्क, अर्सेनिक अल्बम ३० होमिओपथी गोळ्याच्या बाटल्या, सॅनिटायझर बाटल्या हे ब्लड बँकेतील कर्मचाऱ्यांनाही संघातर्फे देण्यात आले.

**वेश्या व्यवसायातील स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघर चालवणाऱ्या सहेली संघाच्या** यांनाही सॅनिटायझर बाटल्यांसर २ सॅनिटायझर स्टँड, १०० तीन पदरी मास्क अशी मदत केली.

याबरोबरच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे **सहाय्यक आयुक्त श्री. चितळे** यांच्याशी संपर्क साधून **पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर** यांच्याकडे **१० इन्फ्रारेड थर्मामीटर, २१० सॅनिटायझर बाटल्या** सुपूर्त करण्यात आल्या. या सर्व कार्यामध्ये सहाय्यक आयुक्त श्री. चितळे यांनी मोलाचे सहकार्य केले.

या सगळ्या कार्यामध्ये सर्वात मोठा वाटा आहे तो या दात्यांचा. आपणा सर्वांच्या आर्थिक सहकार्याशिवाय एवढी मदत करणे शक्यच नव्हते. अगदी रु. ५००/- पासून मदत जमा होत होती. कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष श्री. विजय आंबर्डेकर यांनीही या कार्यास भरपूर मदत केली. पोलिसदलास केलेली मदत पाहून ठाण्याचे पोलिस आयुक्त मा. विवेक फणसळकर यांनी रु.

२५,०००/- अशी मोलाची मदत करून आमचा उत्साह वाढवला. अमेरिकेतील श्री. आशिष फणसळकर यांना संघातर्फे करण्यात आलेली लोकसहभागाची संकल्पना समजली आणि दुसऱ्या दिवशी संघाच्या खात्यात वडिलांमार्फत रु. ३२,७००/- (५०० अमेरिकन डॉलर) इतकी मदत जमा केली. नंतर अमेरिकेतीलच आपल्या संघाच्या हितचिंतक आणि विश्वस्त मंडळातील महिला आघाडी प्रमुख सौ. वैशाली वर्णेकर यांच्या आत्या सौ. अपर्णा खांडेकर व त्यांचे यजमान श्री. विजय खांडेकर यांनी मिळून रु, ५०,०००/- इतकी मोठी मदत केली. तसेच सौ. वैशाली वर्णेकर यांच्याच अमेरिकेतील आत्तेबहीण सौ. लीना सुपनेकर यांनी संघाचे हे कार्य जाणून या कार्यास रु. ४०,०००/- इतकी भरघोस मदत केली. संघातर्फे या सर्वांचे मनःपूर्वक आभार !

अमेरिकेतीलच आपल्या ज्ञातीचे हितचिंतक श्री. प्रकाश नवरे ह्यांनी पौरोहित्य करणाऱ्या व कोरोनामुळे आर्थिक संकटात असलेल्या गरजू लोकांना मदत करण्याची इच्छा पुण्यातील बंधू, पुणे संघाचे हितचिंतक व सभासद श्री. दिलीप नवरे ह्यांच्याकडे व्यक्त केली. याचवेळी संघाकडे कोझर, तालुका - मंडणगड, जि. रत्नागिरी येथील आपले ज्ञाती बांधव ३ महाजन बंधूंची माहिती आली होती. महाजन बंधू यांचे निसर्ग वादळामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले. शिवाय गेले ३ महिने लॉकडाऊनमुळे पौरोहित्य नसल्याने आर्थिक संकट ओढावले होते. त्यामुळे कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे व रत्नागिरी यांच्याकडून त्यांना प्रत्येकी रु. १७,०००/- अशी मदत आधीच दिलेली होती. पण महाजन बंधूंना अजून मदतीची गरज होती व ही माहिती पुणे संघातर्फे श्री. दिलीप नवरे यांना व्हॉट्सअपवर पाठविली व पुढे श्री. दिलीप नवरे यांनी श्री. प्रकाश नवरे यांना कळवले. त्यानंतर तत्काळ श्री. प्रकाश नवरे यांनी महाजन बंधूंच्या खात्यावर प्रत्येकी रु. ७०००/- जमा केले. शिवाय पुण्यातील आपल्या ज्ञातीतील ३ गरजू पुरोहितांना प्रत्येकी रु. ३०००/- अशी मदत केली. या भरघोस मदतीबद्दल श्री. प्रकाश नवरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

या मदत करणाऱ्यांमध्ये कऱ्हाडे नसणाऱ्या व्यक्तिंचाही सहभाग होता. केवळ समाजासाठी करत असलेल्या कार्याची दखल घेऊन या आणि अन्य काही जणांनी संघाला सतत आर्थिक मदत करून आमचा सर्वांचा उत्साह वाढवला. आपल्या पुणे संघाचे कार्यवाह श्री. अमित शहाणे यांचे मित्र श्री. मनीष सिन्हा यांनी संघाच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन दर महिना रु. ५००० याप्रमाणे एकूण रु. १५,०००/- इतकी भरघोस मदत केली. शिवाय जोपर्यंत हे सामाजिक काम सुरु आहे तोपर्यंत याचपद्धतीने मदत करण्याचे आश्वासन श्री. सिन्हा यांनी दिले आहे. संघातर्फे या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

आपला संघ नेहमीच सामाजिक भान जपत वेळोवेळी योग्य ती मदत करत असतो. जनसहभागाच्या देणगीमुळे कोल्हापूर, सांगली येथील महापुराच्या वेळी सुद्धा इचलकरंजी व कुरुंदवाड येथील शाळा आणि नृसिंहवाडी, कोल्हापूर येथील गरजू कऱ्हाडे व्यक्तिंना एकूण रु. १,५०,०००/- इतकी मदत संघातर्फे करण्यात आली होती. तुम्हा सर्वांच्या सहकार्य आणि भरघोस पाठिंब्याशिवाय हे शक्यच नाही.

आपण केलेल्या मदतीच्या आधारे कोणाला कशी प्रकारची मदत केली गेली हे तुम्हा सर्वांना सांगण्याच्या मनोदयाने हा प्रपंच !

संघावर आपला लोभ आहेच. तो असाच असावा आणि वाढत राहावा ही विनंती !

# सद्गुण

चांगुलपणा हा माणसाचा सद्गुण आहे. आपण तो जपण्याचा सातत्याने प्रयत्न केला पाहिजे. एकमेकांना सहकार्य करणे, मदत करणे, दुसऱ्यांबद्दल चांगली भावना ठेवणे हे नेहमीच आचरणात आणले तर जीवनाला एक नवीन आयाम प्राप्त होईल. दुसऱ्यांनी चांगले म्हणावे ही अपेक्षाच चुकीची आहे. स्वत:ला स्वत:चे मूल्यमापन करता आले पाहिजे. आपण जे काही करतो आहे ते बरोबर आहे की चूक आहे, हे आपले अंतर्मन नेहमीच सांगते. त्यामुळे त्याला फसवता येत नाही. प्रत्येकालाच आपण आवडतो असे कधी होत नसते. त्यामुळे स्वत:शीच प्रामाणिक असणे गरजेचे असते. चांगल्या-वाईटांची व्याख्या ही व्यक्तीपरत्वे बदलत असते. ज्याला आपण फायद्याचे ठरतो तो आपणाला चांगला समजतो आणि ज्याला अडचणीचे ठरतो त्याच्यासाठी वाईट ठरतो. मग त्या ठिकाणी आपण बरोबर असलो तरीही ! सगळ्यांनाच खुश ठेवणे शक्य नसते म्हणून आपण स्वत: प्रामाणिक भूमिका ठेवायची, मग कुणी काहीही म्हणो... आपण आपलं चांगलं काम चालूच ठेवायचं... इतरांचं त्यांच्यापाशी. फक्त आपल्यातल्या 'चांगुलपणा' कमी होऊ द्यायचा नाही.



Regd. Periodical RNI - No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)

WE LOVE WHAT WE DO.

VJ | VILAS JAVDEKAR DEVELOPERS

www.javdekars.com

Corporate Office : 306, Siddharth Towers, Sangam Press Road, Kothrud, Pune 411038. T : +91-20-67648000

Book Post ( Regd. Periodical)

To,

प्रेषक :
संपादक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा : कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४३ २४४३